अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४३ । शनिवार ७ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## यूपीएससी परीक्षेत ऋषीकेश आलासे महाराष्ट्रात पहिला




नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा २०२५ मध्ये देशातील एकूण ९५८ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात राज्यातील ६० हून अधिक उमदेवारांचा समावेश आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या वर्ष २०२५ च्या नागरी सेवा मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. ऋषीकेश आलासे ६१,आकाश त्रिवेदी यांनी ७३, गौरव चोपडा यांनी ८३, सायली पगार यांनी ८७ वा तर दिक्षा पाटकर यांनी ८८ वा क्रमांक पटकावला आहे. केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. डिसेंबर २०२५- फेब्रुवारी २०२६ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण ९५८ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे

# शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी

## ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना’ जाहीर


## नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री तथा नवनिर्वाचित अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडताना कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा केली. आम्ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना राबवण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी समिती गठीत केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी आज जाहीर करत आहे, अशी घोषणा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन पर लाभ दिला जाणार असल्याचेही फडणवीस यांनी जाहीर केले.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबत राज्यातील बँकिंग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात येईल. शेतकरी वारंवार कर्जबाजारी न होता त्याला कायमचा कर्जमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प असून समितीच्या शिफारसीनुसार दीर्घकालीन उपाययोजन केल्या जात आहेत, असेही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महायुती सरकार सत्तेत आल्यापासून विरोधकांकडून महायुती सरकारला शेतकरी कर्जमाफीच्या योजनेचे काय झाले, असा जाब विचारत होते. निवडणूक झाल्यानंतर सरकार शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन विसरले, अशी टीका विरोधकांकडून केली जात होती. मात्र, आज देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करुन विरोधकांच्या या टीकेतील हवा काढून घेतली आहे. मात्र, ही कर्जमाफी नेमकी कोणाला मिळणार, याचे निकष आणि तपशील अद्याप समोर येणे बाकी आहे.



### कोणते शेतकरी पात्र ठरणार?

- ✲ दोन लाख रुपयांपर्यंतची थकबाकी असलेले शेतकरी.
- ✲ ज्यांचं पीककर्ज थकलेलं आहे असे शेतकरीच पात्र असतील.
- ✲ ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्ज माफ होणार.
- ✲ नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ.



### महसुली तूट १ टक्क्यांपर्यंत कमी

**यावर्षी अर्थसंकल्पासाठी ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांची खर्चासाठी तरतूद करण्यात आली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तूट येत आहे. राजकोषीय तूट ही ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासन यशस्वी ठरले आहे, तसेच महसुली तूट ही १ टक्क्यांपेक्षा कमी राहिली आहे**

### शेतकरी, ग्रामीण महाराष्ट्रासाठीचा अर्थसंकल्प

- गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूर यांचा हा सहभाग करणार
- पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे
- ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे
- चारही कृषि विद्यापीठात एआयजी मदत घेतली जात आहे
- शेतकर्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे
- १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारीपर्यंत झाले आहे
- चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील
- आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात
- गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचा ही समावेश करणार
- महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल.

### विशेष संपादकीय...

करण नवले

## विकासाचे स्वप्न आणि वास्तवाची कसोटी

**राज्याचे मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला यंदाचा अर्थसंकल्प हा निव्वळ आकड्यांचा खेळ नसून, आगामी निवडणुकांचे वारे आणि राज्याची भविष्यातील आर्थिक दिशा यांचा एक संमिश्र दस्तऐवज आहे. ‘सर्वांचा विकास’ हे ब्रीदवाक्य समोर ठेवून सादर केलेल्या या अर्थसंकल्पात शेतकरी, उद्योजक, तरुण आणि आरोग्य क्षेत्रासाठी मोठ्या घोषणांचा पाऊस पाडण्यात आला आहे. मात्र, या घोषणांच्या पूर्ततेसाठी लागणारी आर्थिक रसद आणि राज्याच्या तिजोरीवरील वाढता कर्जाचा डोंगर, या दोन टोकांवर हा अर्थसंकल्प उभा आहे.**

**शेतकऱ्यांचे सक्षमीकरण की तात्पुरती मलमपट्टी?**

**या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू अपेक्षेप्रमाणे शेतकरीच राहिला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची मर्यादित कर्जमाफी देऊन सरकारने ग्रामीण भागातील रोष कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. सातत्याने येणारे अस्मानी संकट आणि कोसळलेले बाजारभाव यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला या निर्णयामुळे तात्पुरता का होईना, पण दिलासा मिळणार आहे. मात्र, केवळ कर्जमाफीने शेतीचे प्रश्न सुटतात का, हा कळीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**

**पायाभूत सुविधांचा विचार करता, सिंचन प्रकल्पांना दिलेली गती आणि ‘सौर कृषी वाहिनी’ योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे उद्दिष्ट कौतुकास्पद आहे. परंतु, कृषी मालाला हमीभाव आणि साठवणुकीसाठी शीतगृहांचे जाळे विणण्याबाबत अधिक ठोस तरतुदींची अपेक्षा होती.** (पान २ वर..)


## अर्थसंकल्प अजित पवार यांना समर्पित

### अजितदादांचे स्मारक उभारणार : फडणवीस

### अजित पवार नागरी पुरस्कार सुरू करणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** उपमुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पहिलाच अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय घोषणा करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पात १० मोठ्या घोषणा केल्या आहेत.



हा अर्थसंकल्प २०४७ च्या विकासाकडे जाणारा आहे. ऋमहात्मा फुले यांच्या जन्माला २०० वर्ष पूर्ण होत आहे. यासाठी एक समिती स्थापन करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी निधी दिला जाईल. संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा केल्या जातील. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचं काम पूर्ण झालं आहे. ग्रामसमृद्धी अभियान राबवलं जाणार आहे.

अजित दादा पवार यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्या करडी स्वभावामुळे शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणून अजित दादा पवार यांचे भव्य स्मारक उभारले जाईल. त्यांच्या नावाने नागरी पुरस्कार सुरु केला जाईल. हा अर्थसंकल्प मी त्यांना समर्पित करतो, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा तिसरा टप्पा मंजूर करण्यात आला आहे. ग्राम सडक योजनेअंतर्गत ३० हजार गावे जोडली. २४५० किमी रस्त्यांची कामं पूर्ण झाली असून २३ हजार पूलांचं काम हाती घेतलं आहे. मुंबई-पुणे जलदगती ट्रेनसाठी तरतूद करण्यात आली आहे.

गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूरांचा हा सहभाग करणार असल्याची घोषणा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे. ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे. चारही कृषि विद्यापीठात एआयची मदत घेतली जात आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न (पान ४ वर..)



‘समृद्धी’वर जेसीबीच्या बाजूला जेवायला बसले...

## सिसिटीव्ही कामगारांना ट्रकने उडवलं!

### दोघांचा जागीच मृत्यू, ३ जखमी

**संभाजीनगर :** समृद्धी महामार्गावर सीसीटीव्ही बसवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना भरधाव ट्रकने उडवले. या दुर्घटनेत दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दुपारच्या वेळी जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत असताना जेसीबीसह कामगारांना ट्रकने उडवलं. या अपघाताने मोठी खळबळ उडाली आहे.

समृद्धी महामार्गावरील ४०६ पॉईंटवर सीसीटीव्ही बसवण्याचं काम सुरू होतं. दुपारच्या सुमारास काही कामगार जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत होते. त्याच वेळी भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने अचानक जेसीबी आणि तेथील कामगारांना जोरदार धडक दिली. ट्रकची धडक इतकी जोरदार होती की (पान ४ वर..)


### नगरी लोकप्रतिनिधी म्हणतात...



**ना. राधाकृष्ण विखे पाटील :** हा अर्थसंकल्प विकासाची दिशा दाखवणारा आहे. अहिल्यानगरसाठी सिंचन, रस्ते आणि पर्यटन क्षेत्रात तरतुदी अपेक्षित आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या प्रगतीसाठी ठोस पावले उचलली आहेत. आम्ही जिल्ह्याच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करू.



**ना. राम शिंदे:** अर्थसंकल्प दूरदृष्टीपूर्ण आणि समावेशक आहे. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि शेतीसाठी महत्त्वाच्या घोषणा आहेत. अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. सरकारची आर्थिक शिस्त आणि विकासाची गती कौतुकास्पद आहे.




**बाळासाहेब थोरात:** हा अर्थसंकल्प जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारा नाही. शेतकरी, महिला आणि बेरोजगारांसाठी ठोस उपाय नाहीत. फडणवीस सरकार फक्त घोषणाबाजी करत आहे. अहिल्यानगरसाठी अपुरा निधी; विरोध करणार.



**आ. डॉक्टर किरण लहामटे:** अर्थसंकल्पात आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रासाठी चांगली तरतूद आहे. जिल्ह्यातील वैद्यकीय सुविधा वाढवण्यास मदत होईल. मात्र, ग्रामीण आरोग्य केंद्रांसाठी अधिक निधी अपेक्षित होता. एकूण सकारात्मक पाऊल.



**वैभव पिचड:** विकासकेंद्रित अर्थसंकल्प आहे. अहिल्यानगरच्या पर्यटन आणि कृषी क्षेत्राला चालना मिळेल. मुख्यमंत्रींच्या दूरदृष्टीमुळे राज्य प्रगतीकडे वाटचाल करेल. आमदार म्हणून जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील राहू.



**स्नेहलता कोल्हे:** ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाखपर्यंत कर्जमाफी देणारी ही योजना असणार आहे यासह नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान पन्नास हजार पर्यंत घोषित करण्यात आले आहे.



**आ. आशुतोष काळे:** अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि उद्योगांना प्रोत्साहन. जिल्ह्यातील रस्ते आणि सिंचन प्रकल्पांना निधी मिळेल. सरकारची वचनबद्धता दिसते. विकासाच्या गतीला चालना मिळेल.



**आ. हेमंत ओगले:** हा अर्थसंकल्प शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अपुरा आहे. कर्जमाफी आणि किमान आधारभूत किमतीवर लक्ष नाही. अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना निराशा. सरकारला जनतेच्या समस्या सोडवाव्या लागतील.

(उर्वरित पान ४ वर..)

## इंडस्ट्रीसाठी गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद

### राज्य सरकारचा निर्णय : दोन दिवसात व्यावसायिक गॅसही बंद होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षामुळे आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्याच्या झळा आता भारतातही जाणवू लागल्या आहेत. संभाव्य गॅस तुटवड्याचा विचार करून राज्य सरकारने गॅसचा वापर कमीत कमी करण्यावर भर देत उद्योगांसाठी लागणाऱ्या ४७ किलो आणि ४५० किलो क्षमतेच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. घरगुती वापराचा गॅस पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी ही खबरदारी घेण्यात आली असून व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या नव्या ऑर्डर घेऊ नयेत, अशा सूचना डीलर्सना देण्यात आल्या आल्याची माहिती समोर येत आहे.



### उद्योग आणि हॉटेल व्यवसायावर परिणाम

**व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर प्रामुख्याने हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि औद्योगिक क्षेत्रात केला जातो. धातू वितळवणे, पावडर कोटिंग, विविध उत्पादन प्रक्रिया अशा अनेक कामांसाठी हा गॅस अत्यावश्यक असतो. त्यामुळे पुरवठा थांबल्यास उद्योग आणि हॉटेल व्यवसायावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. सध्या उपलब्ध असलेला मर्यादित साठाच व्यावसायिकांना वितरित केला जाणार असून त्यानंतर नवीन पुरवठा बंद राहण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील बीपीसीएलच्या शिक्रापूर प्लांट आणि एचपीसीएलच्या चाकण प्लांट येथून देखील डीलर्सना सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. प्लांट प्रशासनाने डीलर्सना व्यावसायिक गॅस सिलेंडरसाठी गाड्या पाठवू नयेत, तसेच नव्या ऑर्डर स्वीकारू नयेत, असे निर्देश दिले आहेत. व्यावसायिक वापरासाठी उपलब्ध असणारे ५, १९, ३५, ४७ आणि ४२७ किलो क्षमतेचे सिलेंडर सध्या पुरवठ्यासाठी थांबवण्यात आले आहेत. यामुळे हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट्स तसेच विविध उद्योगांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील दोन दिवसांत व्यावसायिक गॅसचा पुरवठा पूर्णपणे बंद (पान ४ वर..)

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचं आश्वासन कुठं गेलं : उद्धव ठाकरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर उद्धव ठाकरे यांनी तीव्र टीका केली आहे. निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत त्यांनी सध्याच्या सरकारवर शेतकरी, सामान्य नागरिक आणि राज्याच्या आर्थिक व्यवस्थेबाबत दिशाभूल केल्याचा आरोप केला. निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सादर झालेल्या अर्थसंकल्पात या आश्वासनाबाबत कोणतीही ठोस घोषणा केली नाही. उलट कर्जमाफीसाठी अनेक अटी आणि नियम लावण्यात आल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली.



उद्धव ठाकरे म्हणाले की, पाच वर्षांपूर्वी आमच्या सरकारने कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांची दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली होती. त्या वेळी कोणत्याही अटी किंवा नियम लावले नव्हते. तसेच कोरोना काळात नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. मात्र सध्याच्या सरकारने कर्जमाफी करताना अनेक अटी लावल्या. उद्धव ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबतही काही प्रश्न उपस्थित केले. या योजनेअंतर्गत महिलांना २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र अर्थसंकल्पात याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली गेली नसल्याचे त्यांनी म्हटले. राज्य सरकारने ३०० कोटी वृक्ष लावण्याची घोषणा केली आहे. मात्र हे वृक्ष नेमके कुठे लावणार आणि त्यासाठी जमीन कुठे आहे हे सरकारने स्पष्ट करावे, असेही ठाकरे म्हणाले. तसेच या जमिनींवर काही आरक्षण आणण्याचा सरकारचा विचार आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

### कंत्राटदारांसाठी योजना

**अर्थसंकल्पामध्ये राज्यातील महामार्ग प्रकल्पांसाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आल्याचा उल्लेख करत ठाकरे म्हणाले की, कंत्राटदारांसाठी ठोस योजना दिसत आहेत. मात्र शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिकांसाठी ठोस उपाययोजना दिसत नाहीत. हा विकासाचा मृगजळ दाखवणारा अर्थसंकल्प असल्याची टीका त्यांनी केली.**

### कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प

**राज्याची आर्थिक परिस्थिती सर्वांना माहिती असताना कर्ज काढून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आल्याचा आरोपही ठाकरे यांनी केला. हा कर्ज काढून दिवाळी साजरी करण्यासारखा अर्थसंकल्प असल्याचे ते म्हणाले. अर्थसंकल्पात वारंवार २०४७ चा उल्लेख करण्यात आला असला तरी जाहीर केलेली कर्जमाफी २०४७ पर्यंत पूर्ण होणार का, याचे उत्तर सरकारने द्यावे, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.**

## संपादकीय

पान १ वरुन

### विकासाचे स्वप्न आणि वास्तवाची कसोटी औद्योगिक झेप आणि विकासाचे 'इंजिन'

महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे आणि हे स्थान टिकवून ठेवण्यासाठी उद्योगांना चालना देण्याचे धोरण या अर्थसंकल्पात स्पष्टपणे दिसते. 'मेक इन महाराष्ट्र'ला अधिक गती देण्यासाठी नवीन औद्योगिक वसाहतींची घोषणा आणि स्टार्टअप्ससाठी जाहीर केलेले विशेष पॅकेज राज्याच्या विकासदराला (त्रृझ) नवी उंची गाठून देण्यास मदत करू शकते. अर्थमंत्र्यांनी राज्याचा विकासदर दोन अंकी करण्याचे जे ध्येय ठेवले आहे, ते गाठण्यासाठी उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे अनिवार्य आहे.

आयटी सेक्टर आणि लॉजिस्टिक हबसाठी दिलेल्या सवलतींमुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मात्र, हे उद्योग केवळ मुंबई-पुणे पट्ट्यात एकवटू नयेत, तर विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातही पोहोचतील, याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**शिक्षण आणि आरोग्य: मूलभूत गरजांकडे कल**

आरोग्य आणि शिक्षण या दोन मूलभूत स्तंभांवर अर्थमंत्र्यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. जिल्हा रुग्णालयांचे आधुनिकीकरण आणि नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना ही काळाची गरज आहे. करोनानंतरच्या काळात आरोग्य यंत्रणेतील उणिवा प्रकर्षाने जाणवल्या होत्या, त्या भरून काढण्याचा प्रयत्न या तरतुदींमधून दिसतो. 'मोफत उच्च शिक्षण' (विशिष्ट वर्गांसाठी) आणि कौशल्य विकासावर दिलेला भर हा तरुणांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाचा ठरेल.

**वित्तीय तूट आणि वास्तवाचे भान**

या अर्थसंकल्पातील सर्वात चिंतेची बाब म्हणजे राज्याचे वाढत जाणारे कर्ज. लोकप्रिय घोषणांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. जर राज्याचे उत्पन्न त्या प्रमाणात वाढले नाही, तर वित्तीय तूट नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पायाभूत सोयीसुविधांसाठी घेतलेले कर्ज हे 'गुंतवणूक' मानले जाते, पण चालू खर्चासाठी कर्ज घेणे हे भविष्यातील आर्थिक आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

कोणत्याही अर्थसंकल्पाप्रमाणेच यावरही राजकीय प्रतिक्रियांची दोन टोके पाहायला मिळत आहेत.

हा अर्थसंकल्प राज्याला ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेकडे नेणारा महामार्ग आहे, अशी भूमिका सत्ताधारी गटाने घेतली आहे. सर्वसमावेशक विकास आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारी ही योजना असल्याचे सत्ताधारी पक्षांचे म्हणणे आहे.

तर हा केवळ घोषणांचा पाऊस असून अंमलबजावणीचा दुष्काळ आहे, अशी टीका विरोधकांनी केली आहे. वाढत्या कर्जाचा बोजा आणि बेरोजगारीच्या प्रश्नावर हा अर्थसंकल्प मौन पाळून असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा 'आशादायी' आहे, यात शंका नाही. मात्र, कागदावरचे आकडे प्रत्यक्षात लोकांच्या खिशात आणि ताटात कधी उतरतात, यावरच त्याचे यश अवलंबून असेल. केवळ दोन लाखांची कर्जमाफी देऊन चालणार नाही, तर शेतकऱ्याला कर्जमुक्त करणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल. उद्योगांना केवळ सवलती देऊन चालणार नाही, तर लाल फितीचा कारभारही कमी करावा लागेल.

थोडक्यात सांगायचे तर, हा अर्थसंकल्प म्हणजे भविष्यातील समृद्ध महाराष्ट्राचे एक स्वप्न आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी पारदर्शक प्रशासन आणि कालबद्ध अंमलबजावणीची 'राजकीय इच्छाशक्ती' महत्त्वाची ठरेल. अन्यथा, अर्थसंकल्प हे केवळ दरवर्षी येणारे एक सरकारी सोपस्कारच राहतील.

# विखे पाटीलांसारखे घराणे प्रत्येक जिल्ह्यात निर्माण व्हावेत : हभप गोपाळ महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** राजकीय क्षेत्रात कार्यरत असतानाही संतसेवेची परंपरा जपणारे विखे कुटुंब समाजापुढे आदर्श असून अशा घराण्यांची निर्मिती प्रत्येक जिल्ह्यात व्हावी, अशी अपेक्षा ज्येष्ठ कीर्तनकार हभप गोपाळ महाराज उरळकर यांनी व्यक्त केली. राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे आयोजित संत तुकाराम बीज उत्सवात त्यांना पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मृती 'संत सेवा पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले.




जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित समारंभात मानपत्र, स्मृतिचिन्ह व ५१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, वरदविनायक सेवाधामचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक, ट्रक्स वाहतूक संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, प्रवरा बँकेचे संचालक किसनराव विखे, सरपंच कल्पना मैड, विकास संस्थेचे अध्यक्ष अशोकराव धावणे,बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, उद्योजक संजय धावणे,नामदेवराव वाबळे, माजी सरपंच लक्ष्मण बनसोडे,भारत महाराज धावणे,ट्रस्टचे अध्यक्ष देवीदास म्हस्के, गोपाल महाराज पाटील, रामभाऊ महाराज पाटील, आनंद महाराज पाटील, करण महाराज पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उरळकर महाराज म्हणाले की, गेल्या २६ वर्षांपासून लोणीत संत तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होत असून ही मोठी संतसेवा आहे. सामान्य कुटुंबात जन्मलो असूनही हा सन्मान मिळणे माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. पुरस्काराची रक्कम प्रशांत महाराज ताकोते यांच्या बालसंस्कार शिबिरासाठी देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शालिनीताई विखे म्हणाल्या की, राज्यातील अध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या निष्काम कर्मयोगींना सहकार भूमीत सन्मानित करणे लोणीसाठी भूषणावह आहे. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी वारकरी संप्रदायाशी नाते जपत समाजकार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

महंत उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, लोणी गावाला वारकरी सेवेची समृद्ध परंपरा असून विखे परिवार संतसेवेत कायम अग्रस्थानी आहे. निष्काम कर्मयोगींचा सन्मान ही गावाच्या वैभवात मोठी भर आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दादासाहेब म्हस्के यांनी केले. गेणुजी सुर्वे यांनी मानपत्र वाचन तर रामचंद्र निंबाळकर यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली.

## मानसिक स्थिरतेसाठी सहज योग महत्त्वाचा : डॉ निलेश जंगले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** मानवी मन हे अत्यंत चंचल आहे. मनामध्ये अस्थिरता निर्माण झाली की मानसिक शारीरिक आणि भावनिक आजार सुरू होतात. म्हणून मनशांती होणे अत्यंत गरजेचे असून चांगल्या मानसिक स्थितीसाठी सहज योग महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ निलेश जंगले यांनी केले आहे.




सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील अमृतेश्वर मंदिर येथे सहजयोग केंद्राच्या वतीने सहजयोगातून साक्षात्काराकडे ही शिबिर संपन्न झाले यावेळी ते बोलत होते या प्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात मा.आ. डॉ सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, सहजयोग केंद्राच्या सुलभाताई दिघे, ॲड. शिवाजीराव दिघे, रोमनिया देशातून गेडीमिनीस मारिया मॅडम, डॉ. बरखा, संजय दिघे श्रीमती ललिता दिघे, सौ लता गायकर,संदीप सातपुते, नामदेव राहणे, विश्वासराव गोरडे, वैशालीताई डांगे, जगन्नाथ घुगरकर, प्रा. विवेक धुमाळ, किरण कानवडे, प्रा जी.बी काळे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना डॉ. जंगले म्हणाले की, मानवी मनात अस्थिरता निर्माण झाली आहे आणि याचा परिपाक जग हे युद्धजन्य परिस्थिती मध्ये आहे. मन शांत असेल तर विकार दूर होतात. आणि याकरता सहज योग महत्त्वाचा आहे. सहज योग म्हणजे स्वतःबरोबर जन्म घेतलेला योग. भूतकाळ किंवा भविष्यकाळाचा विचार करण्यापेक्षा प्रत्येकाने वर्तमान काळाचा विचार करावा. प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यावा शरीरामध्ये निर्माण होणार.

## पुतळा विटंबना प्रकरणी राहुरीत शिवप्रेमींचे आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणाला वर्ष उलटूनही आरोपींना अटक न झाल्याच्या निषेधार्थ राहुरी येथे शिवप्रेमींनी तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले. येत्या चार दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास तपासी अधिकारी, तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) व तहसीलदार यांच्यावर न्यायालयात गुन्हा दाखल करणार, असा इशारा शिवप्रेमी नेते साहेबराव म्हसे यांनी दिला.राहुरी शहरातील कोळीवाडा परिसरातील तालमीत ठेवलेल्या छत्रपती



शिवाजी महाराजांच्या मूर्तीची वर्षभरापूर्वी विटंबना करण्यात आली होती. या घटनेचा तपास अद्याप लागलेला नसल्याने संतप्त शिवप्रेमींनी दि. ६ मार्च रोजी आंदोलनाचा मार्ग अवलंबला. साहेबराव म्हसे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील मुख्य रस्त्यावरून शिवाजी महाराजांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. आंदोलनादरम्यान अनेकांनी काळ्या टोप्या घालून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. ही मिरवणूक तहसील कार्यालयासमोर येऊन आंदोलनात परिवर्तित झाली.यावेळी बोलताना साहेबराव म्हसे म्हणाले की, महाराजांच्या पुतळ्याची विटंबना होऊन एक वर्ष झाले, तरीही आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. पोलिस प्रशासनाने कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करत चार दिवसांत कारवाई न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. रविंद्र मोरे, ॲड. भाऊसाहेब पवार, निलेश जगधने यांसह अनेकांनी यावेळी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. पुतळा विटंबना प्रकरणात संबंधित तपासी अधिकाऱ्यालाच आरोपी करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.या आंदोलनात राजूभाऊ शेटे, संदीप आढाव, सुनील हिवाळे, सुरेश तोडमल, पोपट जाधव, नितीन कल्हापुरे, बाळासाहेब पेरणे, कारभारी खुळे, संतोष धसाळ, विजय उंडे, यमुना भालेराव यांसह असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते. तहसीलदार अमित पवार व पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनीही घटनास्थळी हजेरी लावली.

## शिवस्वरूप होण्यासाठी शिवकथा श्रवण करावी : डॉ. विकासानंद महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** मनुष्य जन्म हा परमार्थासाठीच आहे कानाने भगवंताचे गुण ऐकावे डोळ्याने भगवंताचे मुख पाहावे ज्याला शिवाच्या निरंकार स्वरूपाचे ज्ञान झाले त्यांनी मूर्तिपूजा करण्याची गरज नाही शिवाला नमस्कार करण्यासाठी शिवलिंगाची निर्मिती झाली आहे. शिवस्वरूप होण्यासाठी शिव कथा श्रवण केली पाहिजे असे प्रतिपादन शिव कथाकार डॉ. विकासानंद महाराज यांनी केले.






लोहारे मिरपूर येथील अनंत गायत्री आश्रम ट्रस्ट आयोजित शिव महापुराण कथेप्रसंगी डॉ. विकासानंद महाराज मिसाळ बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर हभप आप्पासाहेब शिंदे महामंडलेश्वर आयुर्वेदाचार्य बाळानंद सरस्वती, हभप भागवतानंद भारती, हभप गणेश दास महाराज, सुभाष करीर, मंजू करीर, श्री अनंत गायत्री आश्रमाचे सुमित स्वामी डॉ. अक्षय शिरसाठ, डॉ. राजेश्वरी शिरसाठ स्नेहल शिरसाठ आश्रमाचे सर्व स्वयंसेवक व कथा श्रवणासाठी परगावहून आलेले भाविक व निरपुर लोहार येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुधवारी पाच पाचवे पुष्प पार पडले कथे दरम्यान शिवपार्वती विवाह चा जिवंत देखावा व्यासपीठावर सादर करण्यात आला. शिव कथाकार विकासानंद महाराज यांच्या वाणीतून सुरू असलेल्या शिवपुराण महा कथा श्रवण करण्यासाठी दिवसेंदिवस भाविकांची मोठी गर्दी होत आहे. सात मार्चपर्यंत सायंकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत ही कथा संपन्नहोणार आहे. कथेनंतर उपस्थित भाविकांना रोज महाप्रसाद वाटप केले जाते.

## श्री संत एकनाथ महाराज पायी दिंडीचे पैठणकडे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक डौले वस्ती येथील उमा महेश्वर वारकरी ग्रुपच्या श्री संत एकनाथ महाराज पायी दिंडीचे शुक्रवारी दि.६ मार्च रोजी ''ज्ञानोबा माऊली तुकाराम''भानुदास एकनाथ असा जयघोष करत पैठणकडे प्रस्थान झाले.या दिंडीत शेकडो वारकरी सहभागी झालेले आहेत.चौथ्या वर्षात पदार्पण करणाऱ्या नेवासा बुद्रुक ते पैठण पायी पालखी दिंडीचे नेतृत्व निवृत्ती डौले,दत्तात्रय रेडे,विणेकरी शंकर कोकणे,सुखदेव डौले,तुकाराम डौले,अण्णा डौले,सोमनाथ मगर हे करत असून या दिंडीमध्ये डौले वस्ती भजनी मंडळ,साईनाथनगर वस्ती भजनी मंडळ,जायगुडे आखाडा भजनी मंडळाचे सेवेकरी सहभागी झाले आहेत. नेवासा बुद्रुक येथील डौले वस्तीपासून पायी पालखी दिंडीचे शुक्रवारी दि.६ मार्च रोजी प्रस्थान झाले दिंडी प्रस्थान प्रसंगी पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.सदरची दिंडी नेवासा बुद्रुक,नेवासा शहरात आली असता या दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत नागरिकांनी केले. संत एकनाथ महाराज पैठण पायी दिंडीचे हे चौथे वर्ष असून दिंडी मार्गावर रात्रीच्या समयी किर्तन व नंतर महाप्रसाद असे ठीकठिकाणी योग्य नियोजन करण्यात आले असल्याचे दिंडी चालक निवृत्ती डौले यांनी यावेळी बोलताना सांगितले



## श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या पुण्यतिथीनिमित्त भास्करगिरी बाबांनी घेतले समाधीचे दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथील महान तपस्वी संत श्री विश्वेश्वर नाथबाबा यांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी निमित्त राष्ट्रसंत भास्करगिरीजी महाराज यांनी समाधीचे दर्शन घेतले. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा यांचे गुरू तसेच शिर्डीचे श्री साईबाबा यांचे गुरूबंधू म्हणून संत विश्वेश्वर नाथबाबा यांना मानले जाते.



या वेळी गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या समाधीचे पूजन करण्यात आले. देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष ज्ञाननाथ जायगुडे यांनी मंदिर परिसरात करण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती त्यांना दिली.

तसेच समाधी मंदिरातील नाथबाबांच्या मूर्तीमागे नव्याने बसविण्यात आलेल्या आकर्षक प्रभावळाचीही त्यांनी पाहणी केली. मंदिर परिसरातील स्वच्छता व झालेल्या विकासकामांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या प्रसंगी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, संत विश्वेश्वर नाथबाबांचे कार्य भक्तांच्या उद्धारासाठी होते. उज्जैन येथून येऊन त्यांनी माऊली व खंडेरायांच्या पवित्र नेवासे क्षेत्री तपश्चर्या केली. संतांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असून नेवासा तीर्थक्षेत्राचे आध्यात्मिक महत्त्व अधिक वाढले आहे.

या प्रसंगी देवस्थानचे विश्वस्त, नाथबाबा तरुण मंडळाचे सेवेकरी, पंचक्रोशीतील भाविक व नेवासा बुद्रुक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महाप्रसादाचे पूजनही गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

## एक बादली पाणी वन्यजीवांसाठी

### जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने वन्यजीवांसाठी पाणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** सध्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे जयाद्री परिसरातील अनेक पाणवठे आटू लागले असून वन्यजीवांना पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर जय मल्हार फाउंडेशन यांच्या वतीने एक बादली पाणी वन्यजीवांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. असून गेली बारा वर्षा पासून सतत फोंडशन काम करत आहे



या उपक्रमांतर्गत जयाद्री खोऱ्यातील कडेपठार परिसरात वनविभाग परिसरातील उपलब्ध पाणवठयात आज पहिल्या टँकराचा शुभारंभ मार्तंड देवसंस्थान अध्यक्ष मंगेश घोणे यांचे हस्ते करण्यात आला यावेळीभाजपा शहर अध्यक्ष सचिन पेशवे, अलका शिंदे,माजी उप नगराध्यक्ष रमेश बयास सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब खोमणे,सचिन तुषार अनिकेत, गोरख कुंभार बंधू, सतीश पवार, आनंद बंडलकर नगरसेवक रोहित खोमणे,राज पाटील,माजी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष नितीन राऊत जेजुरी वनरक्षक धनंजय देवकर, जय मल्हार फॉउंडेशन चे संस्थापक विशाल बारभाई, धनंजय केळकर,विविध पाणवठ्यांवर वन्य प्राणी व पक्ष्यांसाठी पाणी आणि धान्य पोहोचविण्यात आले. फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी परिसरातील झाडांच्या सावलीत पाण्याची भांडी ठेवून त्यामध्ये पाणी भरले तसेच पक्ष्यांसाठी धान्य टाकण्यात आले.उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याच्या कमतरतेमुळे वन्यजीव पाण्याच्या शोधात भटकंती करतात. त्यामुळे त्यांना पाणी सहज उपलब्ध व्हावे आणि त्यांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे फाउंडेशनच्या वतीने संस्थापक विशाल बारभाई यांनी सांगितले. यात वनविभागाच्या विनंती नुसार फॉउंडेशच्या माध्यमातून पाणवठ्यांची निर्मिती करण्याचे आश्वासन दत्ता गावंडे, सचिन कुंभार आणि रमेश बयास बाळासाहेब दरेकर यांनी दिले आहे.पर्यावरण संवर्धनासाठी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी एक बादली पाणी वन्यजीवन साठी, तसेच लग्न, वाढदिवसाच्या वेळी एक टँकर पाणी देणे नागरिकांनीही आपल्या घराजवळ किंवा परिसरात पक्ष्यांसाठी पाण्याची भांडी ठेवावीत, असे आवाहन जय मल्हार फाउंडेशन यांनी केले आहे.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर १७**

# अल्लाह ( परमेश्वर ) संयम करणाऱ्या बरोबर आहेत.

दिव्य कुर आन , '' हें आमच्या पालनकर्त्या ( प्रतिकूल परिस्थितीत ) हीं सहन करण्याची शक्ती आम्हाला प्रदान कर, आणि त्यांच्या समोर आम्हाला दृढतेने उभे कर. आणि या सत्य नाकारणाऱ्या लोकांविरुद्ध आम्हाला सहाय्य प्रदान कर ( सुरह नं. २, सुरह बकरा आ. नं. २५१ ) दिव्य कुर आन मध्ये वारंवार अल्लाह परमेश्वर सांगतो की आम्ही संयम करणाऱ्या बरोबर आहोत. प्रत्येक व्यक्तीला ताबडतोब उत्तर व कोणत्याही कामाचं परिणाम हा ताबडतोब पाहिजे असतात परंतु काही काही ठिकाणी थोडं थोडया वेळाने फळं मिळत असतात.. फळं हें निश्चित भेटत असतात.. चांगल्या कामाचं चांगलं फळं मोबदला- बक्षीस -पुरस्कार, वाईट कामं दुष्कार्म, याचं फळं अगदी तसेच भेटणार.. जमिनीत जें पीक पेरलं तेच भेटत.. संत तुकाराम महाराज,म्हणतात, '' शुद्ध बीजा पोटी रसाळ फळं गोमटी '' अगदी असंच आप आपल्या कोणत्याही कर्माचे असतं.परंतु काही गोष्टींना काही काळ वेळ जाऊ द्यावं लागतं. दिव्य कुर आन म्हणतं, '' सदाचारी हा आहे की ,जे अल्लाह व अंतिम दिवसा(कयामत) वर ईमान ( श्रद्धा ) धारण रतात ; तसेच , सर्व फरिश्त्यां( दुतां )वर , सर्व ग्रंथांवर , सर्व प्रेषितां( पैगंबर, संदेश वाहक ) वर इमान ( श्रद्धा ) धारण करतात व अल्लाह ( परमेश्वरा) च्या प्रेमासाठीच स्वतःला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक व अनाथ - गरजूं, वाटसरूं व याचक (अत्यंत दुबळे - गरीब - पीडित ) तसेच गुलामांच्या मुक्ततेसाठी खर्च करतात , तसेच , नमाज आदा करतात व जकात देतात , तसेच दिलेल्या सर्व वचनांची पूर्तता करतात, आणि किती ही तंगीं ,अडचणी, संकटे आणि आतिशय युद्ध( बिकट) प्रसंगी हीं संयम राखतात , ह्याच लोकांनी स्वतः ला सत्यशील ( सत्यनिष्ठ ) सिध्द केले आहे आणि हेच लोकं अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.( दिव्य कुरआन सुरह नं. २. अल- बकराह आ.नं.१७७) .

संकटात सापडायचे , दुः ख झेलायचे , स्वतः यातना सहन करावयाच्या , विरोध झेलायचं , त्यात संयमी ही राहायचं , स्वतःला धीर ही धरायचा, रोजच्या दैनंदिन कटकटी , समस्या सुटता सुटत नाहीत , सामाजिक परिस्थिती हीं फार कटकटीची होऊन जाते, मग अडचणी निर्माण होतात मग अडचणींना वैतागून, माणूस अशा व्यापाने समस्यांनी कधी कधी वैफल्यग्रस्त होउन चुकीच्या मार्गाने जाउन गुन्हेगारीच्या विळख्यात सापडण्याची शक्यता असते. तेथेही त्याची आशा पुर्ण नाही होवू शकली तर तो व्यसनाधीन होउन त्याला शेवटी कधी गुन्हेगारी क्षेत्रात जाण्याची, आत्महत्ये साठी परावृत होण्याची शक्यता जास्त असते, माणूस हतबल होतं, काय करावं हें सुचतच नाही, सगळे पर्याय झालेले असतात तरी हीं शेवटी जें होयचं तेच होतं असतं.मग मनुष्यजास्तच व्यसना धीन होतोय. अशा वेळी काही गोष्टी टाळून धीराने - धीर धरून व संयम धरून सहन करून शांत चित्तानें सबुरी नें घेऊन पुढे जायचं असतं आणि दिव्य कुर आन आपल्या तीस अध्ययामध्ये वारंवार सांगतो की तुम्हीं संयम धरा संयम हें यशस्वी मार्गाची गुरुकिल्ली आहे.

संयम व सहनशीलते मुळे माणुस कितीही मोठ्या समस्या व संकटांच्यां डोंगरातुनही मोठ्या कौशल्याने आपले लक्ष गाठणयात यशस्वी होतो , संयम - सहनशीलता बाळगणारे लोकच संसारीक व परलौकिक जीवनात यशस्वी होतात.

दिव्य कुर'आन , '' बेशक , अल्लाह सब्र करनेवालों के साथ है '' अर्थात :- '' अल्लाह( परमेश्वर ) संयम- सहनशील धरणाऱ्या लोकां ( व्यक्ती) बरोबर आहे ''.

दिव्य कुराण मधे सत्तर ( ७० )ठिकाणी, वारंवार श्रध्दावानाच्यां संयमाची धीराची कसोटीत पक्क पास होण्यासाठी व जगात कोणतीही गोष्टीं साठी अल्लाह ने ताकीद दिली आहे व समजावून ही सांगितलेले आहेत.

पुढे ,दिव्य कुर आन सांगते की, '' जे श्रद्धांवान अडचणी, तंगी मध्ये कुठल्याही बिकट परिस्थिती - प्रसंगात , संकटसमयी सत्य- असत्याच्या युध्दात संयम व धीर बाळगतात ,हेच लोक खरे सत्वशील - सत्यनिष्ठ सिध्द होतात व हेच खरे अल्लाह चे भय बाळगणारे आहेत.'' ( सुरहा बकरा आ नं. १७७). जीवन हे समस्यां आणि दुःखाने ग्रस्त आहेत, आजारं, आर्थिक तंगी , अपयश, समाजात विरुद्ध परिस्थिती, कायमच बिकट परिस्थिती. विरोधातच कायम वातावरण, अशा एक ना अनेक प्रश्न आपल्या रोजच्या जीवनात आपल्याला पहायला मिळतात परंतु या सर्व समस्यांना घाबरून न जाता सत्याची कास न सोडता व आर्थिक तंगीमधे व्यवस्था व्यवस्थित हाताळू न शकल्याने कधी माणुस गुन्हेगारी क्षेत्रात , कधी चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता असते परंतु हे न करता थोडं संयमाने व धीराने घेऊन अल्लाह वर भरवसा( श्रद्धा ) ठेवून , अल्लाह शी प्रार्थना -दुआ-करत आपले प्रयत्न हळूहळू करत परिस्थितीत कालांतराने बदल होऊन सुरळीतपणे चांगली होतं असते , परंतु त्या वाईट काळात शांत सहनशीलता दाखवून , संयमाने घेत अपले जीवन समाधानी व पारलौकिक जीवनात सुध्दा मुक्ती मिळत असते.

समाजात तुमच्या विरुद्ध परिस्थिती निर्माण झालेली आहेत अशा समस्यांतही मनुष्य विचलित व गांगारुन जातो आशा परिस्थितीत माणसाला संयम -धीर धरून परमेश्वर अल्लाह वर निंतात श्रध्दा( इमान भरोसा )ठेवण्याची आज्ञा प्रेषित मुहम्मद स्व. नीं दिली आहे.


प्रेषित मुहम्मद स्व सल्लम . सांगतात की,'' जेव्हा एखाद्या श्रद्धावान एखाद्या आजारांने ग्रस्त असतो , एखाद्या विरोधी परिस्थिती निर्माण होतें , काही गोष्टीची काळजी अथवा दु:ख किंवा त्रास होत असतो , आशा स्थिती मधे अल्लाह आशा संयमी व्यक्तींनां पुण्यं देतात ,सबाब देतात !! , एवढे च कशाला तर साधा काटा ही टोचतो , तर , तेव्हा या सर्व समस्यांमुळे अल्लाहा त्यांचें सर्व पाप माफ करतो '' ( सहीह बुखारी शरिफ).

खरोखरच कशाहीं बिकट परस्थितीत सुध्दा सदाचाराची कास सोडली नाही व अल्लाह, ( परमेश्वराला) समोर इमान - श्रद्धा ठेवलं, तर नक्कीच आपण चुकीच्या मार्गाने कधीच जाणार नाही.

दिव्य कुरआन मधे समस्त सृष्टींचा पालनहार वारंवार ताकीद - सक्तीने सांगतात ,'' बेशक , अल्लाह सब्र करनेवालों के साथ है ''.

हेच प्रशिक्षणाचे काम संपूर्ण महीनाभर रोजा (उपवास )त चालतं, रमजान दिवसभर रोजे व संपूर्ण तीस दिवसांच्या चोवीस तास ट्रेनिंगमुळे संयम सहनशीलता ,धीर धरणे ची भावनाच तयार होऊन मनुष्य चारित्र्यावान ही बनतो आणि हिच महीनाभर कमावलेल्या उर्जेचा स्त्रोत संपूर्ण वर्षभर टिकून राहते...

संपूर्ण श्रद्धा ( इमान ) ठेवून ( शांतता - )सबुरी बेशक ठेवून ! सर्व गोष्टी सुरुळीत होतात, श्रद्धा व सबुरी ठेवा त्याचं फळं निश्चितच चांगलेच असणार आहेत.



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## कडीत बुद्रुकच्या उपसरपंच पदी प्रा. ईश्वर होन यांची निवड




**कोल्हार** : श्रीरामपूर तालुक्यातील कडीत बुद्रुक ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जनसेवा मंडळाचे प्रा.ईश्वर धर्माजी होन यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल प्रवरा बँकेचे संचाल भाऊसाहेब पाटील वडितके आणि प्रथम महिला लोकनियुक्त सरपंच ज्योतीताई शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला. ईश्वर होन हे विखे यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांच्या या निष्ठेची दखल घेऊनच त्यांना उपसरपंच पदाची जबाबदारी सोपवण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी माजी उपसरपंच रामदास अण्णा वडितके, प्रकाश होन, शिवाजी वडितके,ग्रामपंचायत सदस्य विठाबाई पंढरीनाथ वडितके, सुमन मेनगर, स्वाती कुलकर्णी, गंगाधर राजभोज,माजी सरपंच पांडुरंग शिंदे, राधाकिसन होन, कर्णासाहेब होन, दत्तात्रय चोथे, रावसाहेब वडितके, प्रवीण मेनगर, बाळासाहेब वडितके, आकाश वडितके, ईश्वर वडितके. तसेच ग्रामपंचायत अधिकारी संजय गायकवाड, कर्मचारी शिवाजी मेनगर, वैष्णव होन व मोठ्या संख्येने ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## अँग्रोबाबा प्रोड्युसर कंपनीत शासकीय हमीभावात हरभरा खरेदी

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील ब्राम्हणगांव वेताळ येथील अँग्रोबाबा प्रोड्युसर कंपनी लिमिटेड ने शासकीय हमीभाव खरेदीने १४ हजार क्विंटल हून अधिक सोयाबीन खरेदी करून शेतकऱ्यांचे ७ कोटी ५६ लाख ७१ हजार रूपये अदा केल्यानंतर आता ५८७५ प्रति क्विंटल हमीभाव दराने हरभरा खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार असून शेतकऱ्यांनी १ ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत शेतकऱ्यांनी हरबरा नोंदणी करण्याचे आवाहन कंपनीच्या वतीने करण्यात आले आहे. १३३५ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्रावर नोंदणी केलेली होती. खुल्या बाजारात ३९०० ते ४२०० प्रतिक्विंटल बाजारभाव असताना .ब्रामहणगांव येथील शासकीय हमीभाव ५३२८ मिळून १५ दिवसांत पेमेंट मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. आता हरभरा प्रतिक्विंटल ५८७५ भाव मिळणार असल्याने हरबरा उत्पादक शेतकऱ्यांचा नोंदणीसाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे. ३१ मार्च पर्यंत हरबरा नोंदणीची मुदत असुन शेतकऱ्यांनी हरबरा पीक नोंद असलेला सात बारा उतारा,आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, आधार लिंक मोबाईल नंबर ही कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे.

## प्रवरेच्या ऋतुजा भालेरावची कृषी उपसंचालकपदी निवड



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी ऋतुजा भालेराव हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत कृषी उपसंचालक (वर्ग १) पदावर निवड मिळविली आहे. ती महिला प्रवर्गातून राज्यात पाचवी तर खुल्या प्रवर्गातून बत्तीसाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे यांनी दिली. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे व प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मार्गदर्शन व्याख्याने, औद्योगिक प्रशिक्षण, शिवार फेरी आदी उपक्रम आयोजित केले जातात. दरम्यान, स्पर्धा परीक्षांची प्रेरणा व मार्गदर्शन महाविद्यालयातून मिळाल्यामुळेच हे यश मिळाल्याचे ऋतुजा भालेराव हिने सांगितले.

## भोंदूबाबा प्रकरणी तक्रारींसाठी अंनिसचे आवाहन

**बेलापूर** : देव अंगात संचारल्याचा आव आणून काही भोंदूबाबा भक्तांचे आर्थिक, शारीरिक व मानसिक शोषण करत असल्याच्या चर्चा बेलापूर व परिसरात सुरू आहेत. अशा प्रकारे भोंदूगिरी करणाऱ्या बाबांबाबत कोणाकडेही ठोस माहिती किंवा तक्रार असल्यास अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन अंनिसच्या राज्य सचिव ॲड. रंजनाताई गवांदे, बाबा आरगडे आणि देविदास देसाई यांनी केले आहे. अंनिसच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बेलापूर परिसरातील एका भोंदूबाबाने काही महिलांचे लैंगिक शोषण केल्याची चर्चा होत आहे. मात्र बाबांच्या भीतीमुळे तसेच बदनामीच्या धास्तीमुळे पीडित महिला पुढे येऊन तक्रार देण्यास धजावत नसल्याचे सांगितले जाते. ज्या महिलांची आर्थिक किंवा शारीरिक फसवणूक झाली असेल, त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांशी अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित भोंदूबाबाची भोंदूगिरी समाजासमोर आणून त्याच्यावर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित बाबाविरोधात कारवाई करण्याच्या दृष्टीने अंनिसने हालचाली सुरू केल्या असून, या बाबाने भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक वसुली केल्याचीही चर्चा परिसरात आहे. या बाबाकडे येणाऱ्यांमध्ये काही राजकीय पुढाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती अंनिसच्या कार्यकर्त्यांना मिळाली असल्याचे सांगण्यात आले. तसेच या भोंदूबाबाच्या कारनाम्यांना पाठीशी घालणाऱ्या आणि प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित पुढाऱ्यांची नावेही उघड करण्यात येणार असल्याचा इशारा अंनिसच्या राज्य सचिव ॲड. रंजनाताई गवांदे, बाबा आरगडे, देविदास देसाई आणि छायाताई बंगाळ यांनी दिला आहे.

# विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करून प्रगतीचा मार्ग निवडावा : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : 'बदलत्या काळानुसार शिक्षण पद्धतीत मोठे बदल होत असून विद्यार्थ्यांनी जुन्या ज्ञानाच्या भक्कम पायावर नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून प्रगतीचा मार्ग निवडावा. पारंपरिक ज्ञान विद्यार्थ्यांना मूल्ये, संस्कार आणि विचारांची दिशा देते, तर आधुनिक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर स्पर्धा करण्याची संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे दोन्ही गोष्टींचा समन्वय साधणे ही काळाची गरज आहे.' असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कोल्हार येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शैक्षणिक विषयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचे एकत्रीकरण' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उदघाटन शालिनीताई विखे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा सहकारी बँकेचे चेअरमन, डॉ. भास्करराव खर्डे होते. यावेळी प्रज्ञा शक्ती फौडेंशन आणि माजी विद्यार्थी बॉबी फिलिप्स, सहसचिव भारत घोगरे, संभाजीराजे देवकर, अशोक असावा, सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, साहेबराव दळे, राजेंद्र राऊत,प्राचार्य डॉ.हरीभाऊ आहेर, चर्चासत्राचे समन्वयक प्रा. परमेश्वर विखे उपस्थित होते. आपल्या भाषणात शालिनीताई विखे यांनी सांगितले की, 'आज कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, ऑनलाइन शिक्षण साधने यांचा वापर वाढत असताना विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य आणि सर्जनशील उपयोग करून ज्ञानार्जन करावे.

तसेच संशोधन, नवकल्पना आणि सर्जनशीलता यांना प्राधान्य देऊन समाजाच्या विकासात योगदान द्यावे', असे आवाहन त्यांनी केले. डॉ. भास्करराव खर्डे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग ही क्षेत्रे भविष्यकाळातील वेगाने वाढणारी करिअर क्षेत्रे आहेत. या चर्चासत्रातून नवीन संशोधन, नवकल्पना आणि शैक्षणिक धोरणांसाठी मार्गदर्शन मिळेल', असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बॉबी फिलिप्स यांनी ही मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सेमीनार प्रोसिडिंगचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरीभाऊ आहेर यांनी केले. चर्चासत्राचे समन्वयक प्रा. परमेश्वर विखे यांनी चर्चासत्र घेण्यामागील भूमिका विशद केली. डॉ. बॉबी फिलिप्स यांनी बीजभाषण केले. आभार डॉ. प्रतिभा कानवडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. संगीता धिमते व प्रा. प्रणीता जाधव यांनी केले.

सदर चर्चासत्र दोन दिवस चालणार असून यात महाराष्ट्र राज्य व राज्याबाहेरील वेगवेगळ्या विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील सुमारे सत्तर संशोधक प्राध्यापक आपले शोधनिबंध सादर करणार आहेत. तज्ञ प्राध्यापक, व्यासंगी संशोधक आणि शिक्षक यांना एकत्र आणून विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी हे चर्चासत्र अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

# बसस्थानकासमोर छत्रपतींचे भव्य स्मारक उभारणार : आ. सत्यजीत तांबे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : संगमनेर येथील हायटेक बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असून नागरिकांच्या मतानुसार स्मारकाची रचना निश्चित केली जाईल, अशी घोषणा आमदार सत्यजीत तांबे यांनी केली. संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक कसे असावे? या विषयावर नागरिकांच्या मत नोंदणी अभियानाचा शुभारंभ बसस्थानक परिसरात करण्यात आला.

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, संदीप साळुंखे, सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, विश्वासराव मुर्तडक, सौरभ कासार, भारत बोराडे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार सत्यजीत तांबे म्हणाले की, संगमनेर बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांची दीर्घकाळापासूनची इच्छा आहे. २०१८ मध्ये नगरपरिषदेने या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानंतर २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळात या कामाला गती मिळाली. २०२३ मध्ये तत्कालीन परिवहन मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून बसस्थानक परिसरात स्मारकासाठी जागा मंजूर करण्यात आली.

शासनाकडून निधी मिळाला तर उत्तमच; अन्यथा लोकवर्गणी, नगरपरिषद, आमदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पुढील वर्षभरात हे स्मारक उभारले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व समाजघटकांचे प्रेरणास्थान असून त्यांनी बहुजनांचे स्वराज्य उभे केले.

त्यामुळे संगमनेरमध्ये त्यांचे भव्य स्मारक उभारणे ही सर्वांची सामूहिक भावना असल्याचेही तांबे यांनी सांगितले. नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, शहराच्या विकासकामांमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून स्मारकाबाबतही नागरिकांच्या मतांचा आदर केला जाईल.

### मत नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ स्मारक, उभे पूर्णाकृती स्मारक किंवा सिंहासनाधीश्वर स्वरूपातील स्मारक असे तीन पर्याय नागरिकांसमोर ठेवण्यात आले आहेत. ही मत नोंदणी तीन दिवस सुरू राहणार असून पहिल्याच दिवशी ६११३ नागरिकांनी आपले मत नोंदविल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# धांदरफळ खुर्दला महसूलचे उद्या महाराजस्व अभियान शिबिर!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**





**संगमनेर** : तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील बिरोबा मंदिर परिसरामध्ये रविवार दिनांक ७ मार्च रोजी महसूल विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत विविध दाखल्यांचे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्धाटन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरामध्ये धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, गोडसेवाडी, नांदुरी दुमाला, मिर्झापूर, निमगाव बुद्रुक, निमगाव खुर्द, पेमगिरी, सांगवी, कौठे धांदरफळ, सावरचोळ, धुपे, मेंगाळवाडी व शिरसगाव या गावांतील नागरिकांना विविध महसुली सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या अभियान शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरी असलेले ७/१२ व ८-अ उतारे वाटप करण्यात येणार आहे. तसेच उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र यांसह विविध दाखले देण्यात येणार आहेत. या शिवाय अकृषिक (छ-) परवानगी व तरतुदींबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थेनुसार 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शालेय दाखले यांचाही समावेश आहे. तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादन अन अकृषिक परवानगी संदर्भातील 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्याचे कामही यावेळी करण्यात येणार आहे.

शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवांचा एकाच ठिकाणी लाभ मिळणार असल्याने परिसरातील गावांतील नागरिकांनी या महाराजस्व अभियान' शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवरायांमुळे मंदिरात देव राहिला : स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : छत्रपती शिवरायांमुळे मंदिरात देव राहिला असून हिंदूधर्म टिकला असे उद्गार स्वामी प्रकाश नंदगिरी महाराज यांनी काढले. सालाबाद प्रमाणे टाकळीभान येथे तिथीनुसार ६ मार्च २०२६ रोजी शिवजयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाश नंदगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी स्वामी प्रकाश नंदगिरीजी महाराज व हनुमान गडचे प्रमुख ह.भ.प. संतोष महाराज चौधरी या संत मंडळींच्या हस्ते युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी छत्रपती शिवरायांची आरती महाराजांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी महाराज शिवप्रेमी व ग्रामस्थांना उपदेश करताना म्हणाले की अठरापगड जाती सर्वांना बरोबर घेऊन छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले, आज देवळातील देव , मंदिरे व हिंदू धर्म छत्रपती शिवरायांमुळे टिकला. ते टिकवण्याकरता छत्रपती शिवराय व मावळ्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही, त्यांचे ऋण कधी न फिटण्यासारखे आहे. छत्रपती शिवराय एक आदर्श शासक, नीतीवंत, शेतकऱ्यांच्या हिताचा, व रयतेचा जाणता राजा म्हणून लाखो मनांच्या हृदयामध्ये आदराचे स्थान मिळवले आहे. आजच्या तरुण पिढीने छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून परस्त्री मातेसमान मानवी व तरुणांनी निर्व्यसनी राहावे असा संदेश दिला. शिवजयंती उत्सव कार्यक्रमाची शोभा दिवसेंदिवस वाढत असून कार्यक्रमास परिश्रम घेणारे गावातील युवक तरुण मंडळ यांचे महाराजांनी विशेष कौतुक केले. याप्रसंगी शिवजयंती कार्यक्रम प्रसंगी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब आवरे यांचा शिवप्रेमी व ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# कोकमठाण येथे आज समाधान शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी** : राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत नागरिकांचे शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मंडळ स्तरावर एक दिवशीय समाधान शिबिराचे आयोजन करणे प्रास्ताविक आहे.

त्या नुसार कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण मंडळात आ. आशुतोष काळे यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ चे भव्य आयोजन रामदासी महाराज आश्रम, कोकमठाण येथे शनिवार दि. ७ रोजी सकाळी ९ ते सायं ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्धाटन आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते उप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी प्रांताधिकारी माणिकराव आहेर, कोपरगाव तालुक्याचे तहसीलदार महेश सावंत याच बरोबर संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहे. यामध्ये कोकमठाण मंडळातील शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करून तक्रारी निकालात काढल्या जाणार आहे.

सामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना आपल्या शासकीय कामांसाठी, दाखल्यांसाठी किंवा जमिनीच्या नोंदींसाठी विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागतात. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हीचा अपव्यय होतो. हीच बाब लक्षात घेऊन आ. आशुतोष काळे यांनी पुढाकार घेऊन समाधान शिबिराचे नियोजन केले आहे. यामुळे कोकमठाण परिसरातील ग्रामस्थांना एकाच दिवसात आणि एकाच ठिकाणी आपले प्रलंबित प्रश्न मार्गी लावता येणार आहेत. या शिबिरामध्ये महसूल विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, भूमी अभिलेख विभाग, महिला व बाल विकास विभाग आणि आरोग्य विभाग यांसारख्या महत्त्वाच्या विभागांचा समावेश असणार आहे.

## सुजाता इंटरनॅशनल स्कूलला बायफोकल कॉम्प्युटर सायन्स कोर्सला मान्यता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला विज्ञान शाखेतील बायफोकल कॉम्प्युटर सायन्स कोर्सला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वात्सल्य प्रतिष्ठानच्या शैक्षणिक कार्यात आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण सोनवणे यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत होते.

अखेर या प्रयत्नांना यश मिळत बायफोकल कॉम्प्युटर सायन्स या २०० गुणांच्या अभ्यासक्रमाला मान्यता प्राप्त झाली आहे. या अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांची क्षमता मंजूर करण्यात आली आहे. यापूर्वी संस्थेला माहिती तंत्रज्ञान विषयासाठी १८० जागांची मान्यता मिळालेली आहे.

तसेच संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्य मंडळाचे इंग्रजी माध्यम शाळा, सीबीएससी पॅटर्नची शाळा, विज्ञान शाखेचे महाविद्यालय तसेच मॉडर्न कॉलेज ऑफ बीसीए असे विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. सध्या संस्थेमध्ये सुमारे दीड हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात मागे राहू नये, यासाठी ही नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील शिक्षणाची नवी संधी उपलब्ध होणार आहे. संस्थेमार्फत धनगर समाजातील सुमारे २०० विद्यार्थ्यांसाठी मोफत वस्तीगृह व शिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. बायफोकल कॉम्प्युटर सायन्स कोर्सला मान्यता मिळाल्याबद्दल संस्थापक किरण सोनवणे, प्राचार्या ज्योती सोनवणे तसेच शिक्षकवृंद यांचे परिसरातील विविध स्तरातून कौतुक होत आहे.

# संत तुकाराम महाराज मंदिर प्रांगणात तुकाराम बिजोत्सवाची सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : तुकाराम तुकाराम ...नाम घेता कापे यम...असा नामघोष करत नेवासा येथील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम बिजोत्सवाची पुष्पवृष्टी करून गुरुवर्य महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता करण्यात आली.जगद्गुरू संत तुकोबारायांचे कार्य हे मानव जीवांच्या कल्याण्यासाठी व समाजाच्या उद्धारासाठी होते असे प्रतिपादन सोहळयाचे मार्गदर्शक महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांनी यावेळी बोलताना केले. संत तुकाराम महाराज यांच्या बीजेच्या निमित्ताने तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गाथा पारायणासह अखंड हरिनाम सप्ताहासह श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तनात हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी तुकोबारायांचे जीवन कार्य व भक्ती मार्गातील कार्य विषद केले. परमार्थ हा नवनीतासारखा आहे, त्यामुळे प्रपंचाला परमार्थाची जोड देणाऱ्यांना आत्मिक सुखाची प्राप्ती होते असे सांगून संत तुकोबारायांची गाथा म्हणजे पाचवा वेद असून तो जगाच्या कल्याणासाठी व मनुष्य जिवाच्या उद्धारासाठी संत तुकोबारायांनी निर्माण केला.वेदांचा अधिकार सर्वसामान्य माणसाला मिळवून देण्यासाठी त्यांनी कार्य केले असल्याचे सांगितले.

यावेळी पुष्पवृष्टी करून संत तुकाराम महाराजांचा सदेह वैकुंठगमन सोहळा साजरा करण्यात आला. कीर्तन प्रसंगी हभप विश्वनाथ महाराज मंडलिक, संत तुकाराम महाराज मंदिर संस्थानचे विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप,ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,साहेबराव महाराज चावरे,हभप भिसे बाबा, दिलीप महाराज बर्डे,कचरू महाराज निर्मळ,विजय महाराज,सीताराम झिने पाटील, शंकर लोखंडे, इंजि. सुनील वाघ,अँड.बापूसाहेब गायके, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, विष्णूपंत ठोसर, डॉ. मुरलीधर कराळे,रामनाथ नन्नवरे, रखमाजी नाचण, गणेश डोंगरे,रावसाहेब पेचे,कृष्णा शिंदे,बन्सी आगळे, दशरथ मुंगसे,राजेंद्र परदेशी, माजी सरपंच सतीश गायके, यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतसेवक बाळासाहेब झिने यांनी सूत्रसंचालन करून उपस्थित भाविकांचे आभार मानले. यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## पान १ वरुन

### इंडस्ट्रीसाठी गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद

होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.
घरगुती गॅसला प्राधान्य- सरकारकडून घरगुती एलपीजी सिलेंडरचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. कारण युद्धामुळे आखाती देशांमधील ऊर्जा पुरवठा साखळीवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम भारतातील ऊर्जा बाजारावर किती काळ जाणवेल, याकडे उद्योग आणि व्यापारी वर्गाचे लक्ष लागले आहे

### अर्थसंकल्प अजित पवार यांना समर्पित

वाढण्यास मदत होत आहे. ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारी पर्यंत झाले आहे. चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात होणार आहे. मुंबईत केंद्राच्या मदतीने इंडियन इन्स्टिट्यूट क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी सुरु, पुणे हे जीसीसीसाठी देशात सर्वाधिक पसंतीचे शहर आहे. जगात गेमिंग क्षेत्रात अव्वल होण्यासाठी महाराष्ट्रात २९५ पेक्षा जास्त गेमिंग स्टुडिओ तयार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सातारा जिल्ह्यातील वासोटा किल्ल्यावर पर्यटकांसाठी रोप वे प्रकल्प उभारणार आहोत. नागपूरच्या रामटेकमध्ये तिसरी चित्रसृष्टी उभारणार आहोत. मुंबईत अजून एक भुयारी मेट्रो करणार, अटल सेतू मुंबई विमानतळाला जोडणार, राज्यात १ हजार २०० किमीचे मेट्रो मार्ग उभारणार आहोत. ६ हजार किमीचे द्रुतगती मार्ग विकसित करणार आहोत. २०२९ पर्यंत १६५ किमी मेट्रो मार्गिका तयार करणार आहोत. दक्षिण मुंबईला २०२८ पर्यंत समृद्धी महामार्गासोबत जोडणार आहोत. वर्सोवा-भाईंदर किनारी मार्ग डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करणार, पनवेल ते कर्जत मार्ग अंतिम टप्प्यात, लवकरच वाहतुकीसाठी खुला करणार असल्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अशीच सुरु राहणार आहे. या योजनेकरता आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. उद्योग धोरणातून ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्मिती राज्याचे नवे गुंतवणूक धोरण जाहीर करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सुक्ष्म व लघू केंद्र स्थापन केले जातील. सूक्ष्म, लघु आणि मध्य उद्योग केंद्र उभारणार आहोत. ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहे. प्रधानमंत्री सौर योजनेअंतर्गत रुफ टॉप सोलर बसवणार, बांबू विकास प्रकल्प वाढवणार, परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल आहे. मुंबई आणि पुण्यात ५० अब्ज डॉलरचे केंद्र तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. गडचिरोली नवं स्टील हब म्हणून उदयास आले आहे

### सिसिटीव्ही कामगारांना ट्रकने उडवलं!

कामगारांना सावरायलाही वेळ मिळाला नाही. या भीषण अपघातात दोन कामगारांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.अपघातानंतर परिसरात गोंधळ उडाला. जखमी कामगारांना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आलं आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. समृद्धी महामार्गावर सीसीटीव्ही बसवण्याचं काम सुरू असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. दुपारच्या वेळी जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत असताना ट्रकने जेसीबीसह कामगारांना उडवल्याने ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि महामार्ग सुरक्षा पथक घटनास्थळी दाखल झाले. समृद्धी महामार्गावर घडलेल्या या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. कामगार सीसीटीव्ही बसवण्याचं काम करत असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. सध्या या घटनेनंतर जखमींवर उपचार सुरू असून अपघातात मृत्यू झालेल्या कामगारांची ओळख अद्याप समोर आलेली नाही. अपघाताचे नेमके कारण शोधले जात आहे. समृद्धी महामार्गावर झालेल्या या दुर्घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# संगमनेर बसस्थानकात उभारला अश्वारूढ पुतळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने शिवसेना-महायुतीच्या वतीने आमदार अमोल खताळ यांच्या संकल्पनेतून संगमनेर बस स्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या ठिकाणी सायंकाळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, बंधू राहुल खताळ तसेच मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख शिवसेनेचे शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्यासह



महायुती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी हस्ते मंत्रोच्चारात शिवपूजन करून महाआरती करण्यात आली.दरवर्षीप्रमाणे यंदाही संगमनेर बस स्थानकाच्या प्रवेशद्राजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. शहरात अश्वारूढच पुतळा उभारला जाईल असे फलकही सर्वत्र झळकले आहे. बस स्थानकाच्या प्रवेशद्राजवळ हा पुतळा उभारल्या मुळे येणाऱ्या-जाणाऱ्या शिवभक्तांचे तो खास आकर्षण ठरला आहे.लहान मुलांपासून ते तरुण-तरुणी, महिला-पुरुष अशा सर्वच नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर फोटो काढत आपल्या मोबाईलमध्ये त्या क्षणांची छबी कैद केली. त्यामुळे संपूर्ण संगमनेरकरांसाठी हा पुतळा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

## निधन वार्ता

### इदुबाई शिंदे



**वळती :** गं. भा. कै. इदुबाई नानाभाऊ शिंदे (वय ७४ वर्षे) यांचे सोमवार (ता.२) दुपारी ०२.४७ वा. अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या वळती गावचे उद्योजक शरद नाना शिंदे व प्रगतशील शेतकरी सुरेश नानाभाऊ शिंदे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने वळती गावावर शोककळा पसरली असून गावातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### सुनिल साळुंके



**श्रीरामपूर :** येथील पल्लवी केमिकल्सचे मालक व नॉर्दन ब्रँच हरिनाम सप्ताह कमिटीचे अध्यक्ष सुनिल ज्ञानदेव साळुंके (वय-६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहीण, मुलगी, पुतणे, जावई असा परिवार आहे. ते किशोर साळुंके यांचे थोरले बंधू होत.

## जिल्हा क्रीडा विभागाच्या नूतन व्यायामशाळेचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथे जिल्हा क्रीडा विभागाच्या माध्यमातुन ७ लक्ष रुपये निधीच्या नुतन व्यायामशाळेचा उद्घाटन सोहळा पार पडला. जिल्हा क्रिडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते हा उद्घाटन समारंभ पार पडला.यावेळी व्यासपीठावर योगेश हजारे,अस्लम इनामदार, शिवम पटारे,सरपंच अर्चना रणनवरे,उपसरपंच कान्हा खंडागळे, किरण धुमाळ,दिलीपराव लोखंडे,बापुसाहेब नवले,अर्जुन राऊत,मयुर गव्हाणे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते व्यायामशाळेचे उद्घाटन पार पडल्यानंतर झालेल्या कार्यक्रमात बोलताना खुरंगे म्हणाले की,मोबाईल,टिव्ही आणि समाजमाध्यमांमुळे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे.मैदानावर व व्यायामशाळेत मुलांची संख्या कमी झाली आहे.त्यामुळे नविन झालेल्या व्यायामशाळेत गावातील प्रत्येक तरुणाने येऊन आपले शरीर व आरोग्य घडवले पाहीजे.टाकळीभान गावाने कबड्डीची परंपरा अनेक वर्षांपासुन जपली आहे.येथुन घडलेले अस्लम ईनामदार व शिवम पटारे हे जिल्ह्यासह राज्याचा नावलौकीक वाढवत असल्याचे ते म्हणाले.यानंतर बापुसाहेब नवले यांनी मनोगत व्यक्त केले.तर उपसरपंच कान्हा खंडागळे यांनी टाकळीभान गावात क्रिडा संकुल व्हावे अशी मागणी केली.त्यासाठी पाहीजे तो पाठपुरावा ग्रामपंचायत व ग्रामस्थ करण्यास तयार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी राहुल कोकणे,वसीम ईनामदार,सतिश कांगुणे,संदिप जावळे,गणेश इथापे,प्रशांत कोकणे,किरण बोडखे,अमोल चितळे,सुभाष सपकाळ,मनिष वेताळ,रामा शिंदे,रामा बोडखे,सनी जाधव आदींसह ओन्ली साई क्रिडा मंडळाचे खेळाडु व ग्रामस्थ उपस्थित होते.प्रस्तावना संदीप जावळे यांनी केली,सुत्रसंचलन राहुल कोकणे तर आभार वसीम ईनामदार यांनी मानले.

## १.८१ कोटींचा जीएसटी थकवला; व्यापाऱ्याची जमीन जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** जीएसटी कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या करदात्यांविरोधात राज्य वस्तू व सेवा कर विभागाने धडक कारवाईचा बडगा उगारला असून, गंगापूर येथील एका व्यापाऱ्याची साडेसहा एकर स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आली असून संबंधित व्यापाऱ्याकडे तब्बल १ कोटी ८१ लाख ६ हजार ८३२ रुपयांचा जीएसटी कर थकीत असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली आहे.

राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून वारंवार नोटिसा बजावूनही संबंधित व्यापाऱ्याने थकीत रकमेचा भरणा करण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अखेर कठोर पाऊल उचलत मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे गंगापूर व्यापारी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

**करचुकवेगिरीवर विभागाचा इशारा**

करदात्यांनी आपली कर विवरणपत्रे वेळेत भरावीत आणि थकीत रक्कम तातडीने जमा करावी. अन्यथा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा विभागाकडून देण्यात आला आहे. शासनाचा महसूल सुरक्षित ठेवणे आणि प्रामाणिक करदात्यांचे हित जपणे हे विभागाचे कर्तव्य असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

-------------------------

यापूर्वी कन्नड येथील एका व्यापाऱ्याकडील सुमारे १ कोटी २ लाख रुपयांच्या थकबाकीसाठीही अशीच मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे करचुकवेगिरी करणाऱ्यांना राज्य कर विभागाने स्पष्ट संदेश दिला आहे ˉ कर भरा, अन्यथा मालमत्ता जप्तीला सामोरे जा.

सहाय्यक राज्यकर आयुक्त संजीव नागरगोजे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ तसेच वस्तू व सेवा कर कायदा २०१७ च्या कलम ७९ अंतर्गत करण्यात आली आहे. ही धडक कारवाई अपर राज्यकर आयुक्त अभिजीत राऊत आणि राज्यकर उपायुक्त चंद्रशेखर बोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. राज्यकर निरीक्षक अर्चना झमकडे, कोमल ढवण, कर सहाय्यक किशोर कवडे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.कारवाई करण्यात आलेल्या व्यापाऱ्याचे नाव विभागाने जाहीर केलेले नसून, त्याची साडेसहा एकर जमीन जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## अनुदान वसुली नोटिसांवर आ. प्रशांत बंब आक्रमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील व शेतकऱ्यांना प्रशासकीयतांत्रिक चुकीमुळे देण्यात आलेल्या 'अतिरिक्त अनुदान वसुली नोटिसा तात्काळ रद्द करण्यात याव्यात, तसेच प्रलंबित अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित वर्ग करण्यात यावी, अशी ठाम मागणी आ. प्रशांत बंब यांनी केली आहे. याबाबत आ. बंब यांनी दि. ४ मार्च २०२६ रोजी गंगापूर तहसील कार्यालय येथील तहसीलदारांना पत्र पाठवले आहे.

या प्रमुख मागण्या संबंधित सर्व वसुली नोटिसा तात्काळ रद्द करण्यात याव्यात. सातबाऱ्यावर बोजा चढवण्याची अट त्वरित काढून टाकावी. शेतकऱ्यांना परतफेडीचा तगादा थांबवावा. सन २०२५ मधील प्रलंबित अनुदानाची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करावी.



तालुक्यातील न क शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असून अधिक माहितीनुसार तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना अतिरिक्त अनुदान' वसुलीच्या नोटिसा देण्यात आल्या असून, या नोटिसा शेतकऱ्यांच्या कोणत्याही दोषाविना दिल्या गेल्या आहेत.

त्यामुळे या नोटिसा अन्यायकारक असल्याचे सांगितले जात आहे. नैसर्गिक आपत्ती व आर्थिक संकटामुळे शेतकरी आधीच अडचणीत असून, अशा परिस्थितीत प्रशासनाने मानवी दृष्टिकोन ठेवून वसुलीच्या नोटिसा मागे घ्याव्यात व प्रलंबित अनुदान त्वरित वितरित करावे, अशी विनंतीही आमदार बंब यांनी पत्रात केली आहे. तसेच,प्रशासनाकडून करण्यात आलेली कोणतीही कारवाई कायदेशीर असल्यास त्याची माहिती संबंधितांना देऊन आपल्याला प्रत पाठवावी, असेही पत्रात नमूद आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ११७ लाभार्थ्यांना पत्रांचे वितरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत गंगापूर नगरपरिषद हद्दीतील पहिल्या टप्प्यात एकूण ११७ पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्रांचे वितरण गंगापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजय जाधव यांच्याहस्ते करण्यात आले प्रधानमंत्री आवास योजना कक्षाचे शहरस्तरीय तांत्रिक कक्षाचे स्थापत्य अभियंता तज्ञ शेख इजार यांनी उपस्थित लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. तसेच बांधकाम परवानगीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.




नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजय जाधव यांनी लाभार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत घरकुल बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे तसेच घरकुल योजनेबाबत कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा,ज्या लाभार्थ्यांनी अद्याप घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नाही, अशा पात्र लाभार्थ्यांनी त्वरित आपली आवश्यक कागदपत्रे संबंधित विभागाकडे सादर करावीत व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्ष संजय जाधव यांनी केले व पहिल्या डीपीआरनंतर पुढील टप्प्यात सुमारे ४०० अर्जदारांचा दुसरा डीपीआर प्रस्तावित असल्याची माहिती नागरिकांना देण्यात आली.

## नगरी लोकप्रतिनिधी म्हणतात...

**आ. अमोल खताळ:** अर्थसंकल्पात रोजगार आणि उद्योगांसाठी चांगल्या योजना. जिल्ह्यातील युवकांना फायदा होईल. फडणवीस सरकारच्या विकासाच्या धोरणाचे समर्थन. अहिल्यानगरच्या प्रगतीसाठी सहकार्य करू. **आ. विठ्ठल लंघे:** सिंचन आणि पाणी व्यवस्थापनासाठी तरतुदी समाधानकारक. अहिल्यानगरच्या दुष्काळग्रस्त भागाला मदत होईल. मात्र, अधिक ठोस योजना अपेक्षित. एकूण सकारात्मक अर्थसंकल्प. **आ. मोनिका राजळे:** महिला आणि बालकांसाठी योजना चांगल्या. जिल्ह्यातील शिक्षण आणि आरोग्य सुधारेल. अर्थसंकल्प विकासाभिमुख आहे. सरकारच्या प्रयत्नांचे कौतुक. **आ. रोहित पवार:** अर्थसंकल्प फक्त घोषणांचा ढीग आहे. शेतकरी, युवा आणि महिलांसाठी ठोस उपाय नाहीत. अहिल्यानगरसाठी अपुरा; विरोध करणार. सरकार जनतेच्या अपेक्षा पूर्ण करत नाही. **आ. विक्रम पाचपुते:** अर्थसंकल्पात ग्रामीण विकासाला प्राधान्य. जिल्ह्यातील पायाभूत सुविधा वाढतील. मुख्यमंत्रींच्या नेतृत्वात प्रगती होईल. समर्थन देतो. **अनुराधा नागवडे:** सामाजिक विकास आणि महिला सक्षमीकरणासाठी तरतुदी चांगल्या. अहिल्यानगरच्या महिलांना फायदा होईल. अर्थसंकल्प संतुलित आहे. **आ. संग्राम जगताप:** विकास आणि रोजगारावर भर. जिल्ह्यातील युवकांसाठी संधी वाढतील. सरकारची दूरदृष्टी कौतुकास्पद. पूर्ण सहकार्य. **खासदार निलेश लंके:** अर्थसंकल्पात जिल्ह्यासाठी अपेक्षित तरतुदी नाहीत. विकासाच्या नावाने फसवणूक. अहिल्यानगरच्या समस्या सोडवाव्या लागतील. टीका करतो. **खासदार भाऊसाहेब वाकचौरे:** हा अर्थसंकल्प राज्याच्या प्रगतीसाठी उपयुक्त. जिल्ह्यातील प्रकल्पांना निधी मिळेल. सरकारच्या धोरणांचे समर्थन **आ. काशिनाथ दाते:** अर्थसंकल्प संतुलित आणि विकासाभिमुख. अहिल्यानगरच्या शेती आणि उद्योगाला चालना. सकारात्मक प्रतिक्रिया. **आ. सत्यजित तांबे:** युवा आणि शिक्षण क्षेत्रासाठी चांगल्या योजना. जिल्ह्यातील तरुणांना फायदा. अर्थसंकल्पाला समर्थन.

## ऑटोमोबाईल दुकानाला भीषण आग; लाखोंचे साहित्य जळून खाक

वैजापूर । शहरातील मुरारी पार्क परिसरात असलेल्या एका ऑटोमोबाईल दुकानाला शुक्रवारी (६ मार्च) अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. दुकानातून धुराचे लोट बाहेर येत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने वैजापूर नगर पालिकेच्या अग्निशमन विभागाला या घटनेची माहिती दिली. घटनेची गांभीर्य ओळखून नगर पालिकेचे अग्निशमन वाहन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाचे अधिकारी जगन्नाथ थोरात यांच्या नेतृत्वाखाली गणेश निकम, संग्राम ठाकूर, सुमित चिंधाळे, संकेत कवडे, अक्षय वहाडने तसेच वाहन चालक वसीम शेख, रमेश त्रिभुवन आणि प्रमोद निकाळे यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक परिश्रमानंतर आगीवर नियंत्रण मिळवले, ज्यामुळे शेजारील इतर दुकानांना लागणारा धोका टळला. मात्र, या आगीची तीव्रता इतकी मोठी होती की, दुकानातील ऑटोमोबाईलचे संपूर्ण सुटे भाग आणि इतर साहित्य जळून खाक झाले आहे. यामुळे दुकानदाराचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून प्राथमिक अंदाजानुसार लाखो रुपयांचे साहित्य आगीच्या भक्षस्थानी पडले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसले तरी, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच शहरातील लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी धाव घेतली. आमदार रमेश बोरनारे नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र साळुंखे, नगरसेवक प्रशांत कंगले आणि माजी पंचायत समिती सभापती बाबासाहेब जगताप यांनी घटनास्थळाची पाहणी करून पीडित दुकानदाराला सांत्वन दिले. तसेच प्रशासनाने या नुकसानीचा तातडीने पंचनामा करावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

## देवपूजा करतानाच तीव्र धक्क्याने तुकाराम कोते यांचा मृत्यू

**श्रीरामपूर :** गुरूवार दि.५ फेब्रुवारी संत तुकाराम बीज या दिवशी खंडोबा वाकडी येथील जय मल्हार पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे वारकरी तुकाराम रामकृष्ण कोते (वय ७२) यांचे सकाळी ९ वाजता देवपूजा करत असताना अचानक चक्कर येऊन हृदय विकाराच्या झटक्याने निवन झाले. निधनानंतर तुकाराम बीज दिवशी तुकाराम बाबा कोते यांच्या मृत्यूची चर्चा अन् शोक वाकडी गावात व्यक्त करण्यात येत होता. गुरूवारी दुपारी दुपारी २.३० च्या सुमारास वाकडी येथील स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात भजनीं मंडळ, जय मल्हार खंडोबा दिंडी सोहळ्याचे वारकरी,ग्रामस्थ यांनी शोकाकुल वातावरणात तुकाराम रामकृष्ण कोते ऊर्फ तुकाराम बाबा यांना अखेरचा भावपूर्ण निरोप दिला. याप्रसंगी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे संयोजक शिवाजीराव लहारे यांनी शोक व्यक्त करताना सांगितले की कित्येक वर्षांपासून पतिपत्नी पायी पालखी सोहळ्याचे वारकरी आहे. दिंडी सोहळ्यास पंढरपूर येथे मठ बांधण्यासाठी जागा घेण्याचे ठरले. त्यावेळी तुकाराम बाबा कोते व त्यांच्या पत्नी दोघांनीही पावती पुस्तके घेऊन बाहेरच्या पाहुणे मंडळींकडून देणगी जमा करून दिल्याची आठवण करून दिली. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा सुन दोन मुली नातवंडे असा परिवार आहे.



### रोहित पवार सि.ए.परिक्षा उत्तीर्ण



वैजापूर : चेंडुफळ ता. वैजापुर येथील प्रगतिशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते व गावचे माजी सरपंच अशोक पवार यांचे चिरंजीव रोहित पवार यांनी सि.ए.परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केल्याबद्दल सर्वच क्षेत्रातुन अभिनंदन होत आहे. रोहितच्या या यशाबद्दल त्यांच्या पवार कुटुंबातील सर्व सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे.चेंडुफळसारख्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील असतांनाही सुरवातीपासून सि.ए.बनण्याचे उद्दिष्ट रोहितने ठेवले होते .

आणि ते पूर्ण करण्यासाठी चांगली मेहनत घेतली आणि त्याला यश मिळाले यासाठी त्याचे चुलते श्री सुधाकर पवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे.रोहितच्या यशाबद्दल वैजापूर तालुक्याचे आमदार प्रा.रमेश बोरणारे, नगरचे माजी आ. दादाभाऊ कळमकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे विजय पवार, विमा प्रतिनिधी शरद पवार, योगप्रशिक्षक किशोर थोरात व चेंडुफळ परिसरातील सर्व नागरिकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
SAMIRA SHAKUR KHATIK
(Passport No.G9356418 )
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
SAMIRA IRFAN KHATIK
(AADHAR NO. 5213 8328 6760)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
KOPARGAON
PLACE: KOPARGAON
DATE : 06/03/2026

## कर्तव्यस्थळी जाऊन महिला शिक्षिकांचा सन्मान

गंगापूर : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शिक्षक सेनेच्या वतीने गंगापूर तालुक्यातील महिला शिक्षिकांचा विशेष सन्मान करण्यात येत आहे. समाज घडविण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या महिला शिक्षिकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिक्षक सेनेने हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत शिक्षक सेनेचे पदाधिकारी प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन कर्तव्यस्थळीच महिला शिक्षिकांचा सन्मान करणार आहेत. महिला शिक्षिकांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात येणार आहे. ८ मार्च हा जागतिक महिला दिन असून यावर्षी त्या दिवशी रविवारची सुट्टी असल्यामुळे शिक्षक सेनेने ६ व ७ मार्च या दोन दिवसांत तालुक्यातील विविध शाळांना भेट देऊन महिला शिक्षिकांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन दिवसांत तालुक्यातील सर्व शाळांपर्यंत पोहोचून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. महिला शिक्षिका विद्यार्थ्यांच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असून त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे.




त्यांच्या योगदानाचा गौरव व्हावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शिक्षक सेनेच्या वतीने दरवर्षी महिला दिनानिमित्त असा उपक्रम राबविला जातो. शिक्षक सेनेच्या या उपक्रमाचे तालुक्यातील शिक्षक व शिक्षिका यांच्याकडून स्वागत होत असून महिला शिक्षिकांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक सकारात्मक प्रयत्न असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षकसेना मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख उद्धव बोचरे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, तालुका संपर्कप्रमुख कैलास गायके, तालुका कार्याध्यक्ष निलेश कहाटे,तालुका सरचिटणीस सचिन साळुंके, तालुका कोषाध्यक्ष योगेश दांगुर्डे,जिल्हा उपाध्यक्ष दिपक साबळे, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल भास्कर आढाव, सुभाष पल्हाळ, लक्ष्मण जाधव साईनाथ जानराव, सुनिल भापकर, शिवाजी सपकाळ आदींचे सहकार्य आहे.

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि . ७ मार्च २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त    सिंगल ५-१-९ मजबुत

१२६ ४५० ९०० — ९-३ — १२० ६७० ५८०
जोड: ९७-१३-४२ ५८-३०

**कल्याण**
उदय-अस्त    सिंगल ९-४-५ मजबुत

१२५ २६० ४४० — ८-५ — १४० २३० ७८०
जोड: ८६-३५-१०-२९-५४

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त    सिंगल ४-७-९ मजबुत

१२३ २४० २६८ — ६-५ — १४० २३० ६९०
जोड: ६८-१५-९२ ३०-५४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

## द • ख • ल

### तारकपूर आगारात शिवजयंती उत्साहात साजरी, पानपोईचा शुभारंभ



**अहिल्यानगर** : तारकपूर आगार येथे तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच तारकपूर आगार बस स्थानक येथे प्रवासी व वाटसरूंसाठी पिण्याच्या पाण्याच्या पानपोईचे ही उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. या प्रसंगी तारकपूर आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

### केडगावात लंडन किड्स प्री स्कूलची शिवजयंती मिरवणूक उत्साहात



**अहिल्यानगर** : केडगाव येथील ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी काढलेल्या शिवजयंती मिरवणुकीमुळे परिसर शिवमय झाला होता. मिरवणुकीत शिवाजी महाराजांची पालखी तसेच तब्बल १०१ विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध महापुरुषांच्या वेशभूषा विशेष आकर्षण ठरल्या. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, राणी लक्ष्मीबाई, संत तुकाराम यांसारख्या महापुरुषांच्या वेशभूषेत सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. प्रसाद जमदाडे यांनी शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर केला. यावेळी ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार येणाऱ्या पिढीत संस्कारातून रुजविणे गरजेचे आहे. शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला. शाळेपासून ओंकारनगर, शाहूनगर बसस्टॉप मार्गे पुन्हा शाळेत अशी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव संदीप भोर, प्राचार्या रुचिता जमदाडे, शिक्षकवृंद, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत - जामखेडच्या चार महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत आणि जामखेड तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चार महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ विकास योजना (ब वर्ग) 'अंतर्गत या तीर्थक्षेत्रांना आता 'क' वर्गातून 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा अधिकृत दर्जा बहाल करण्यात आला आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता त्यास यश प्राप्त झाले.





शासनाच्या ग्रामविकास विभागाने ५ मार्च रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित केले असून यात या कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र जगदंबा मंदिर देवस्थान (कुळधरण), श्री खंडोबा देवस्थान (शेगुड), श्री लालगीर बुवा मठ ट्रस्ट (मांदळी) या तिन्ही तीर्थक्षेत्रासह जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान (जवळा) देवस्थानांचा आता 'ब' वर्ग श्रेणीत समावेश झाला आहे. तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाल्यामुळे आता या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आणि विकासासाठी शासनाकडून पाच कोटी रुपये प्रत्येक तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने भाविकांच्या निवासासाठी सुसज्ज भक्तनिवास, सभागृह, तीर्थक्षेत्राकडे जाणारे प्रशस्त रस्ते, अंतर्गत सुशोभीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय आणि सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या कामांना प्राधान्य मिळणार आहे.

राज्य निकष समितीने २८ फेब्रुवारी रोजी घेतलेल्या बैठकीत या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून त्यांना मंजुरी दिली होती. त्यानंतर आता शासन निर्णय झाल्याने या भागातील धार्मिक पर्यटनाला आणि स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे.

राम शिंदे यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे कर्जत-जामखेडमधील तीर्थक्षेत्रांचा कायापालट होण्यास मदत मिळणार आहे.

## हद्द निश्चित करा, अन्यथा खा. निलेश लंके उपोषणावर ठाम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड** : जामखेड तालुक्यातील विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जामखेड बंदची दिलेली हाक मागे घेण्यात आली, तरी साखळी उपोषण मात्र सुरूच ठेवण्यात आले आहे. दरम्यान, प्रश्न निकाली न लागल्यास आजपासून पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा खा. निलेश लंके यांनी दिला आहे. जामखेड येथे आंदोलन सुरू असताना खासदार लंके यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांना जाहीर पाठिंबा दिला. त्यांनी सांगितले की, ७ मार्च रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी येऊन हद्द निश्चितीबाबत निर्णय घ्यावा. अन्यथा सकाळी अकरा वाजल्यापासून पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल. दरम्यान, शनिवारी जामखेड शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. मात्र शनिवारचा साप्ताहिक बाजार असल्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने बंद मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तरीही आंदोलनकर्त्यांचे साखळी उपोषण सुरूच ठेवण्यात आले आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना खासदार लंके म्हणाले की, जामखेडमधील सर्वपक्षीय एकजूट ही राज्यासाठी आदर्श ठरावी अशी आहे. प्रशासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देऊन तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. जामखेडला उपोषण ठिकाणी खासदार निलेश लंके यांनी भेट देऊन पाठींबा दिला.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार शिवजयंती महात्मा फुले चौक, कर्जत येथे सर्व तरुण मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाट यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष दादा सोनमाळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे खरे राजे होते. अठरापगड जाती-जमातींना सोबत घेऊन त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. शेतकरी, सर्वसामान्य जनता आणि स्त्रियांचा सन्मान राखणारे आदर्श शासन त्यांनी उभे केले.


शिवरायांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. तसेच शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते उत्तम कृषीतज्ञ, जलव्यवस्थापनाचे जाणकार आणि खगोलशास्त्राचे अभ्यासक होते. बहुजन व दीनदलितांचे तारणहार म्हणून त्यांनी आदर्श राज्यकारभार उभा केला, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी माजी नगरसेविका निता कचरे व आरपीआयचे नेते संजय भैलुमे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पांडुरंग क्षिरसागर यांनी केले, तर आभार तेजस पाटील यांनी मानले.

या प्रसंगी सचिन सोनमाळी, हनुमंत राऊत,नगरसेवक अमृत काळदाते, रोहन कदम, रघुमामा शिंदे, धनंजय अगम, राजेंद्र भांड, उमेश जपे, राजेंद्र येवले, आरती थोरात, विठ्ठल सोनमाळी, सुमित भैलुमे, संजय नेवसे यांच्यासह परिसरातील नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

## अशोक आयडियल स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अशोक सहकारी साखर कारखाना संचलित अशोक आयडियल स्कूल (सीबीएसई) मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोरावके कॉलेजचे प्राध्यापक डॉ. एस. एस. कऱ्हाळे, तर प्रमुख अतिथी म्हणून विज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. डी. बी. बनकर हे होते. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. सी व्ही रमण यांच्या रमण इफेक्ट या संशोधनाला मिळालेल्या नोबेल पुरस्कारानिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या दिवशी आयोजित केलेल्या प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे उदघाटन प्रमुख अतिथी डॉ. डी. बी. बनकर व सौ. मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या हस्ते करण्यात आले.




प्रदर्शनात इयत्ता पहिली ते नववीचे विद्यार्थी सहभागी झाल्यामुळे प्रत्येक वर्गातून उत्कृष्ठ प्रथम तीन क्रमांक निवडण्यात आले. इयत्ता पहिलीच्या वर्गातून प्रथम क्रमांक चि. पवार चैतन्य, द्वितीय क्रमांक यादव सानवी, तृतीय क्रमांक शेरकर शिवराज, बहिरट भूमी, इयत्ता दुसरीतून प्रथम क्रमांक कदम अथर्व द्वितीय कोळसे समृद्धी तृतीय उंबरे उत्तुंग भालदंड, इयत्ता तिसरीतून प्रथम क्रमांक बडाख वेदिका द्वितीय जाधव आदेश तृतीय होळकर प्राची, इयत्ता चौथी या वर्गातून प्रथम क्रमांक कवडे आरोही द्वितीय घुने तनुश्री तृतीय देसाई शिवांश तसेच इयत्ता पाचवी या वर्गातून प्रथम होन तन्वी द्वितीय देसाई काव्या,पटारे धनश्री तृतीय जायभाय श्रेयश, शेरकर आरव, सहावी वर्गातून प्रथम यादव अनन्या द्वितीय कदम वैभवी तृतीय जगताप आरोही, सांगळे अक्षरा सातवी या वर्गातून प्रथम क्रमांक काकडे यशराज, भिडे चिराग द्वितीय कासार अनुष्का, तृतीय वाघ अंशुल,शिवरकर आर्यन इयत्ता आठवी या वर्गातून प्रथम घुने भक्ती,कोल्हे वेदिका द्वितीय चव्हाण सोहम, पवार अर्णव तृतीय तुवर दर्शन इयत्ता नववी या वर्गातून प्रथम बोर्डे आयुष द्वितीय घुणे कार्तिक,दौंड निशांत तृतीय काळे रितेश, शिवरकर सोहम,राऊत सार्थक या विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.

परीक्षक म्हणून अशोक पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राध्यापक म्हसे यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य रईस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभागाच्या शिक्षिका सायमा शेख तसेच रोमा भाटिया यांनी विशेष परिश्रम घेतले. पाहुण्यांचा परिचय आरोही औताडे यांनी केला. सूत्रसंचालन भक्ती घुणे, वेदिका कोल्हे तर आभार अनुष्का कासार हिने मानले.

## राज्याचा अर्थसंकल्प कृषी व पूरक व्यवसाय विकासासाठी दिशादर्शक ; डॉ अशोक ढगे

**प्रतिनिधी / दादा सोनवणे**

**नेवासा** : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प २०२६ सादर केला तो कृषी आणि पूरक व्यवसायाच्या विकासासाठी दिशादर्शक आहे असे प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी व्यक्त केले.



शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी लगेच जोड प्रकल्प यांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे तसेच राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र सुरू करणार आहे शेतकऱ्यासाठी कर्जमाफी पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर योजना ३० सप्टेंबर २०२५ कर्जमाफी मर्यादा रुपये दोन लाख करून घोषित केले आहे तसेच नियमित कर्ज फेडणारा शेतकऱ्यांना रुपये पन्नास हजार प्रोत्साहन पर लाभ देण्यात येणार आहे.

कृषी बरोबर पशुधन योजना व मत्स्य योजना शेतीला पूरक व फायद्याचे आहेत तथापि शेतीला संरक्षण कायदा आला पाहिजे यासंदर्भात उल्लेख नाही.

# परिचर्या सेवेतून समाजाचे आरोग्य उंचावेल : शलिनीताई विखे





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असून समाजाचे शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य उंचावण्याची मोठी जबाबदारी परिचर्या विद्यार्थ्यांवर आहे. सेवाभाव, शिस्त आणि समर्पण या गुणांच्या जोरावर परिचर्या विद्यार्थी समाजाच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम बनवतील, असा विश्वास माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मा. सौ. शलिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात दि. ५ मार्च रोजी दीपप्रज्वलन, शपथग्रहण, पदवी प्रदान, माजी विद्यार्थी मेळावा आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी शलिनीताई विखे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच फाउंडेशनचे विश्वस्त वसंतराव शाहूजी कापरे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आधुनिक परिचर्या सेवेच्या जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत बी.एस्सी. नर्सिंग आणि जनरल नर्सिंग अँड मिडवाइफरी अभ्यासक्रमातील सुमारे १८० विद्यार्थ्यांनी मनोभावे रुग्णसेवेची शपथ घेतली. यावेळी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या १२० विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना हॉस्पिटल टीममध्ये नर्सेसना समानतेची व सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी तब्बल १९५ माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. त्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कला व क्रीडा विभागातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकाचे तसेच नर्सिंगच्या शिक्षकांनी लिहिलेल्या नर्सिंगमध्ये नेतृत्व आणि व्यवस्थापन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे सेक्रेटरी डॉ. पी. एम. गायकवाड (टेक्निकल), संचालक (मेडिकल) प्रा. डॉ. अभिजीत दिवटे, ब्रिगेडियर डॉ. अरुण त्यागी (क्लिनिकल डायरेक्टर), मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. रामचंद्र पडळकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रो.फी जमा रु.
प्रो.पा.नं.
ने.ता. ६/४/२६

### जाहीर नोटीस

दिलीप द. औताडे,
ॲडव्होकेट, श्रीरामपुर,
दिनांक ६/३/२६

श्रीरामपुर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात
वा.चौ.अ.क्रमांक ०५/२०२६
नि.५

श्री. पोपट निवृत्ती महाडीक, वय-६० वर्ष धंदा-शेती, रा.माळेवाडी ता. श्रीरामपुर जि.अहिल्यानगर,
**अर्जदार**-विरुध्द
**सामनेवाले**-कोणीही नाही
अर्ज-इंडीयन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे
वारस प्रमाणपत्र-सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी अर्जदार यांची आई नामे गंगुबाई निवृत्ती महाडीक या दिनांक २२/९/२०२५ रोजी मौजे माळेवाडी ता. श्रीरामपुर येथे मयत झालेल्या आहेत तसेच अर्जदाराचे वडील निवृत्ती मुकींदा महाडीक हे दिनांक ३/९/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा मुलगा या नात्याने एकमेव कायदेशिर वारस आहे.

अर्जदाराची आई गंगुबाई महाडीक यांचे मृत्युसमयी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिवाजीरोड श्रीरामपुर जि.अहिल्यानगर मध्ये बँक खाते क्रमांक ६०३१५०७६२०५ या मध्ये दिनांक २८/११/२०२५ पावेतो रक्कम रुपये १,२१,७४२.५४ पैसे इतकी रक्कम शिल्लक होती. सदर रक्कम अर्जदार यांनी बँकेकडे वारस या नात्याने मागणी केली असता बँकेने दिनांक २८/११/२०२५ रोजी सदर रकमेबाबत मे. कोर्टाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली, म्हणुन सदर अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदाराचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

आज रोजी ६/३/२६ माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी हुकूमावरून दिले असे.

**कामगिरी क्लार्क,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर,**
**श्रीरामपुर**

शिक्का

**हुकुमावरुन**
**सहायक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर,**
**श्रीरामपुर**


# सरकारी जमीन 'बेवारस' घायपातवाडीत लाकूड चोरांचा सुळसुळाट!

## नगरपरिषद अनभिज्ञ मग जबाबदार कोण?

**प्रतिनिधी / दादा सोनवणे**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा-जामखेड रोडवरील घायपातवाडी परिसरात महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मात्र या जमिनीचा ताबा नेमका कोणाकडे आहे याबाबत प्रशासनातील विभाग एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. घायपातवाडी नजीक गट क्रमांक १२३७ व १२०८ मधील जमिनीच्या सातबाऱ्यावर मालक म्हणून महाराष्ट्र शासन अशी नोंद असून इतर अधिकारात फॉरेस्ट अशी नोंद आहे.



### थ नागरिकांचा संतप्त सवाल

सरकारची जमीन सातबाऱ्यावर स्पष्ट नोंद तरीही प्रशासनातील सर्वच विभाग आमची नाही म्हणत असतील तर बेकायदेशीर वृक्षतोड थांबवणार कोण? असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, जमिनीचा ताबा कोणाकडे आहे यावर प्रशासनातच गोंधळ असल्याने लाकूड चोरांना मोकळे रान मिळाले आहे.

### झाडे तोडतायत पण प्रशासन झोपेत!

गट नं. १२३७ व १२०८ मधील जमीन, सातबाऱ्यावर महाराष्ट्र शासन - फॉरेस्ट नोंद, वन विभाग म्हणतो ताबा आमचा नाही, नगरपरिषद म्हणते माहितीच नाही, भिक्षेकरी गृह म्हणते आमचा संबंध नाही, आणि दरम्यान लाकूड चोरांचा धुमाकूळ सुरूच आहे.

त्यामुळे या जमिनीचा संबंध वन विभागाशी असल्याचे स्पष्ट दिसत असतानाही वन विभाग मात्र या जमिनीचा ताबा आमच्याकडे नसल्याचे सांगत हात झटकताना दिसत आहे. वन विभागातील अधिकाऱ्यांनी उलट या जमिनीचा ताबा नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे असल्याचे सांगितले.

मात्र नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विचारणा केली असता अशी कोणतीही जमीन आमच्या ताब्यात असल्याची माहिती नाही, असे सांगण्यात आले. दरम्यान काही नागरिकांनी या परिसराचा संबंध पुरुष भिक्षेकरी गृहाशी असल्याचा दावा केला. मात्र त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनीही त्या क्षेत्राशी आमचा काही संबंध नाही, जमीन सरकारची आहे, असे स्पष्ट सांगत जबाबदारी झटकली. या सर्व गोंधळात लाकूड चोर मात्र बिनधास्तपणे झाडांवर कुऱ्हाड चालवत असल्याची चर्चा स्थानिकांत सुरू आहे. दिवसाढवळ्या वृक्षतोड होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

काही जाणकार नागरिकांच्या मते, सातबाऱ्यावर मालक म्हणून महाराष्ट्र शासनाची नोंद असल्यामुळे या जमिनीबाबत महसूल विभाग व तहसीलदार कार्यालयाची जबाबदारी ठरते. त्यामुळे प्रशासनातील नेमका कोणता विभाग या जमिनीचा कारभारी आहे, हा प्रश्न आता अधिकच गडद झाला आहे.

## द•ख•ल

### शिरूर नगरपरिषदेने थकीत मालमत्ता सील केली



**शिरूर:** नगरपरिषदेने थकीत मालमत्ता कर भरण्यात उशीर करणार्यांविरुद्ध धडक कारवाई करत दोन मालमत्ता सील केल्या आहेत. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी नागरिकांना कर वेळेत भरण्याचे आवाहन केले आहे.नगरपरिषदेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर दरवर्षी १ एप्रिलपर्यंत भरणे अनिवार्य असून, कालबाह्य झाल्यास दरमहा २% शास्ती लागू केली जाते. मुख्याधिकारी पाटील यांनी सांगितले की, शहरात नगरपरिषदेच्या घंटागाडीद्वारे कर भरण्याबाबत दवंडीही सुरू आहे. सप्टेंबर २०२५ पासून कर न भरल्यास २% शास्ती लागू होईल, तर ऑगस्ट २०२६ पासून विशेष वसूली अभियानही राबविले जाणार आहे. शिरूर नगरपरिषदेच्या करसंकलन विभागाने थकीत मालमत्ता धारकांविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी कर वसुलीची मोहीम तीव्र करण्यात आली असून, सी.टी. बोरा कॉलेज रोडवरील दोन मालमत्ता सील केल्या आहेत. कर भरण्याचे आवाहन करत मुख्याधिकारी पाटील यांनी जप्ती व अटकावणी टाळण्यासाठी वेळेत कर भरावा असे सांगितले. यावेळी नगरपरिषदेच्या पथकात कर निरीक्षक माधव गाजरे, दीपक कोल्हे, विद्युत अभियंता तेजस शिंदे, स्थापत्य अभियंता समाधान मुंगसे, अग्निशमन अधिकारी सचिन वाळुंज यांसह अनेक अधिकारी उपस्थित होते.

### पुण्यात ७ ते ११ मार्चदरम्यान 'मिनी सरस सावित्री जत्रा'

नाझरे सुपे (प्रतिनिधी):- पुणे जिल्हा परिषदेमार्फत आयोजित मिनी सरस सावित्री जत्रा २०२५-२६ हे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शन ७ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत ॲग्रीकल्चर कॉलेज मैदान, सिंचन नगर, शिवाजीनगर येथे भरविण्यात येणार आहे. या जत्रेमध्ये जिल्ह्यातील १२० महिला बचत गट सहभागी होऊन विविध हस्तकला वस्तू, खाद्यपदार्थ तसेच मांसाहारी व शाकाहारी पदार्थांचे स्टॉल उभारणार आहेत. या सावित्री जत्रेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. जत्रेमध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादने, हस्तकला वस्तू, ग्रामीण भागातील पारंपरिक पदार्थ तसेच खाद्यपदार्थांची विक्री केली जाणार आहे.

### भारनियमनावर उपाययोजना करण्याची मागणी

**शिरूर:** भूमिपुत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी शिरुर शहर व परिसरात आगामी काळात होणाऱ्या संभाव्य भारनियमनासंदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. मार्च महिन्यापासून पुढील काही महिन्यांत महावितरणकडून मोठ्या प्रमाणात भारनियमन होत असल्याचे नागरिकांनी अनुभवले असून, यामुळे शहरातील लोकांवर मोठा त्रास होत आहे.भूमिपुत्र प्रतिष्ठानने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहर व परिसरातील वीज खंडित होण्याच्या वेळा



नोंदवून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला जाईल. तसेच, दिवसभर वीज खंडीत होण्याची कारणे नोंदवली जातील. पूर्ण महिनाभरातील वीज पुरवठा खंडित होण्याच्या आकडेवारीसह कारणे महावितरणकडे पत्राद्वारे कळविली जातील. जर संतोषजनक उत्तर मिळाले नाही, तर आंदोलन करण्याची तयारी असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. भूमिपुत्र प्रतिष्ठानने महावितरणकडून भारनियमन केल्याबाबत लेखी माहिती मागितली असून, यासाठी तातडीने योग्य त्या उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

# देवमळा ग्रामपंचायतची पहिली ऐतिहासिक ग्रामसभा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**देवमळा :** : ७८ वर्षानंतर नव्याने स्थापन झालेल्या देवमळा ग्रामपंचायतची पहिली ऐतिहासिक ग्रामसभा उत्साही आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेची सुरुवात संत तुकाराम महाराजांना वंदन करून करण्यात आली. ग्रामस्थांनी दवणे मळ्याला नव्या नावाखाली ग्रामपंचायतीचा नवा चेहरा मिळाल्याचा आनंद व्यक्त केला.

ग्रामसभेत गावाच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयासाठी जागा निश्चित करणे, दिव्यांगांची नोंदणी, मिळकतींची नमुना क्र. ८ कर आकारणी रजिस्टरमध्ये नोंद, पती-पत्नीच्या संयुक्त नावे नोंदणी, ग्रामपंचायत कर्मचारी भरती, पाणीपुरवठा योजना आणि ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामांचा आढावा यांचा समावेश होता.



शासकीय योजना, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी उपाययोजना, तसेच गावातील मयत मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याचे विषय देखील चर्चेत आले. सभेचे संपूर्ण चित्रीकरण करण्यात आले.

ग्रामसभेच्या आदल्या दिवशी महिलांची स्वतंत्र सभा पार पडली. या सभेत महिलांनी सक्रिय सहभाग नोंदविला आणि बचत गट स्थापन करून व्यवसायाच्या दृष्टीने स्वावलंबनाचा संकल्प व्यक्त केला.

सभेला अध्यक्षस्थान प्रशासक सागर कांबळे यांनी भूषविले, तर सचिवस्थान ग्रामपंचायत अधिकारी पुंडलिक म्हस्के यांनी सांभाळले. विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते, तर गावातील महिला, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. अध्यक्ष कांबळे यांनी सांगितले की, युवकांनी मांडलेल्या नव्या संकल्पनांवर सविस्तर चर्चा करून योग्य प्रशासकीय कामकाज केले जाईल.

ही ऐतिहासिक ग्रामसभा ग्रामविकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरली असून, स्वातंत्र्यानंतर विकासापासून वंचित राहिलेल्या जेजुरी ग्रामीण परिसरातील वाडी-वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी एकमताने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# बळीराजाच्या विजेसंकटावर 'हायव्होल्टेज' पाठपुरावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे/सासवड** :- तालुक्यातील १५ गावांत १०० घतअ चे ट्रान्सफॉर्मर अन ७ नवीन रोहित्र; कार्यकारी अभियंता गवई यांनी दिले सकारात्मक आश्वासन पुरंदर तालुक्यातील शेतीचा कणा असलेल्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांनी ठोस उपाययोजना करण्यासाठी कंबर कसली आहे. तालुक्यातील माळशिरस, राजूरी, पिंपरी, नायगावसह १५ गावांतील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या वीज प्रश्नावर त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे (चडएइ) कार्यकारी अभियंता गवई साहेब यांची भेट घेऊन आरपारची चर्चा केली. या पाठपुराव्यामुळे आता या भागात वीजपुरवठ्याचे 'सक्षमीकरण' होणार असून, शेतकऱ्यांना लो-व्होल्टेजच्या त्रासातून कायमची मुक्ती मिळणार आहे. शेतीच्या पाण्याचा मार्ग मोकळा गेल्या काही काळापासून वाढत्या वीज लोडमुळे ट्रान्सफॉर्मर वारंवार जळणे आणि वीजपुरवठा खंडित होणे, या समस्यांमुळे माळशिरस, राजूरी, पिंपरी, मावडी सुपे, नायगाव, रिसे, पिसे, पोंढे, पांडेश्वर, नाझरे सुपे, नाझरे क.प., रानमळा, कोथळे आणि धालेवाडी या परिसरातील शेती सिंचन धोक्यात आले होते. ही बाब गांभीर्याने घेत माऊली यादव यांनी प्रशासकीय दरबारी हा विषय लावून धरला. या पाठपुराव्यामुळे पुरंदरच्या या पट्ट्यात माऊली यादव यांच्या कार्याचे मोठे कौतुक होत असून, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. **काय आहेत निवेदनातील 'मास्टरस्ट्रोक' मागण्या?**

क्षमतेचा विस्तार: १५ ठिकाणी जुन्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी १०० घतअ क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे. विस्तार योजना: ७ अत्यंत गरजू ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) मंजूर करणे. सुरक्षितता: धोकादायक ठरणाऱ्या लोंबकळणाऱ्या वीज तारांचा (लाईन झोळ) प्रश्न सोडवणे आणि नवीन फ्युज बॉक्स बसवणे.



पुरंदर तालुक्यातील १५ गावांतील वीज समस्यांबाबत महावितरणचे कार्यकारी अभियंता गवई साहेब यांना निवेदन देताना पंचायत समिती सदस्य माऊली यादव. यावेळी विविध तांत्रिक सुधारणांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# बारामतीतील वेश्याव्यवसायाच्या अड्ड्यावर बारामती तालुका पोलिसांचा छापा

## पाच आरोपींना अटक चार मुलींची सुटका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती तालुका पोलिसांनी भिगवण रोडवरील प्रणव लॉजवर छापा टाकत देहव्यापाराच्या अड्ड्यावर मोठी कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत यांनी याबाबत बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी सोमनाथ महादेव खोमणे (रा.सावळ, ता. बारामती), धिरज रामभाऊ जाधव (रा.जालना), सागर संजय सोडबुके ( रा. बारामती), मेराजुल जानीफ अली (रा.गोलपारा,आसाम), अफजल मझीबर रहमान हुसेन (रा.बरपेटा, आसाम) आणि सदाम जुमरुद्दीन हुसेन (रा.बरपेटा,आसाम) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ५ मार्च रोजी सायंकाळी भिगवण रोडवरील प्रणव लॉज येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी परराज्यातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उपजीविका चालवित असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

या कारवाईत पोलिसांनी आसाम येथील रहिवासी असलेल्या तीन वय ३०, वय २१, वय २६, आणि पश्चिम बंगाल येथील १ वय २२ वर्षे अशा चार महिलांची सुटका केली.ा प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३ तसेच स्त्रिया व मुली अनैतिक



व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव हे करत आहेत. या कारवाईमुळे लॉजिंग व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.ी कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील धनश्री भगत पोलिस अंमलदार नितीन ढवाण भारत खारतोडे दादा दराडे नीलेश वाकळे सोनाली सूर्यवंशी स्मिता गायकवाड चालक आफरीन शेख विठ्ठल तरंगे यांनी केली आहे.

### बारामतीत प्रेमी युगलाला कोयत्याने मारहाण करून लुटणाऱ्या तिघांना अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामतीतील तांदुळवाडी येथे एलसी कंपनी लेक परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. (दि.२६) फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८.४० वाजण्याच्या सुमारास तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी संतोष रायनवार (बदलेले नाव) (मूळ राहणार नागपूर वय २६, हल्ली बारामती) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते. त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघा इसमांनी त्यांच्या जवळ येत लोखंडी सत्तूर,कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली. विरोध केल्यावर एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर वार करून जखमी केले. त्यानंतर आरोपींनी सोन्याची सुमारे २१ ग्रॅम वजनाची चैन (किंमत ३ लाख रुपये), चांदीची अंगठी (५ हजार रुपये), चांदीची चैन (१५ हजार रुपये), आणखी एक चांदीची अंगठी (२ हजार रुपये) व २ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला व 'परत इकडे यायचं नाही' अशी धमकी देत तेथून पसार झाले.

याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात येथे बी.एन.एस कलम ३०९(६),३(५) अन्वये दाखल करण्यात आला आहे. गोपनीय माहितीवरून तपासादरम्यान प्रसाद गणपत भोसले वय २४ धैर्यशील प्रशांत आगवणे वय १९ व कृष्णा नाना गाडेकर वय २१ (सर्व रा. तांदुळवाडी, ता.बारामती) यांना २८ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, मनोज पवार जितेंद्र शिंदे, राजू बन्ने व पथकाने केली.

# सासवडकरांनो सावधान टॅक्स भरला नाही तर नाव 'चौकात' झळकणार नगरपरिषदेचा 'मोठ्या' थकबाकीदारांना दणका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** तुम्ही सासवड नगरपरिषदेचा घरपट्टी किंवा पाणीपट्टीचा कर थकवला असेल, तर आता सावध होण्याची वेळ आली आहे. वारंवार सूचना देऊनही कर न भरणाऱ्यांची नावे आता चक्क शहरातील मुख्य चौकाचौकांत डिजिटल बोर्डवर लावली जाणार आहेत. सासवड नगरपरिषदेने थकबाकीदारांविरुद्ध पुकारलेल्या या 'थेट मोहिमेमुळे' शहरात मोठी खळबळ उडाली आहे. **पाच पथके 'ॲक्शन मोड'मध्ये :** नगरपरिषदेने केवळ नोटिसा बजावून न थांबता आता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली आहे. त्यासाठी ५ विशेष वसुली पथके तयार करण्यात आली असून ही पथके सध्या शहरात फिरून थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कापण्याचे काम करत आहेत. २५ हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ४४४ मालमत्ता धारकांवर ही कुऱ्हाड कोसळणार आहे. **बड्या थकबाकीदारांचे दुकानगाळे होणार सील**ज्यांची थकबाकी १ लाख रुपयांच्या पुढे गेली आहे, अशा ६४ बड्या थकबाकीदारांची यादी प्रशासनाने तयार केली आहे. केवळ पाणी बंद करून प्रशासन थांबणार नाही, तर या थकबाकीदारांचे व्यावसायिक गाळे सील करण्याची आणि प्रसंगी जप्त मालमत्तेची विक्री करण्याची कडक भूमिका मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी घेतली. आहे. **मुख्याधिकाऱ्यांचा निर्वाणीचा इशारा** "शहराचा विकास



आणि नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी कर भरणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आता केवळ विनंती करून थांबणार नाही, तर कायदेशीर मार्गाने जप्ती आणि नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई तीव्र केली जाईल," असा स्पष्ट इशारा मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी दिला आहे. **महत्त्वाची माहिती:** सुटीचा वार विसरा: नागरिकांच्या सोयीसाठी शनिवार आणि रविवारीही पालिकेची कर भरणा केंद्रे सुरू राहणार आहेत. ऑनलाईन सोय: घरबसल्या कर भरण्यासाठी ऑनलाईन सुविधेचा वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. अतिघाई नको: कारवाई टाळण्यासाठी आजच आपली थकबाकी भरून नगरपरिषदेला सहकार्य करा.

# बारामती शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसची कार्यकारणी जाहीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बारामती शहर युवक कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बारामती शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, युवक शहराध्यक्ष अभिजीत घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली




शहर पक्ष कार्यालयात झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून व पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी युवक काँग्रेस बारामती शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आल्याची माहिती युवक शहराध्यक्ष अभिजीत घाडगे यांनी दिली. या प्रसंगी बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, माजी नगराध्यक्ष इम्तियाज शिकलकर, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते, विद्यार्थी सेल अध्यक्ष मेघराज माने तसेच कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते होते. अ श ी आहे युवक कार्यकारणी शहर युवक उपाध्यक्ष - संदीप अडागळे, गौरव जाधव, रोहित तपकिरे, सचिन नगरे, श्रीकांत सोनवणे, ओंकार महाडिक, कुणाल झगडे, किशोर पाचंगे, युवक कार्याध्यक्ष - गौतम शिंदे, अभिजीत ढवाण, मयूर दराडे, युवक सरचिटणीस - शुभम गालींदे, स्वप्नील काकडे ,प्रसाद लोळगे, ओंकार शिंदे, सुरज खामगळ, योगेश पवार ,साबीर पठाण, राहुल बनकर , युवक संघटक - रोहित चौधर, धनंजय ढवाण, आयुष गुप्ता, स्वप्निल हेंद्रे, प्रियांशु भोसले, प्रतीक जोजारे , प्रसाद गाडे, गणेश काजळे, ओंकार जाधव, प्रणव जमदाडे युवक सोशल मीडिया प्रमुख - तुषार सावंत

# उच्चशिक्षित तरुणास स्टंपने मारहाण

सोशल मीडिया ; रिल्सचा वाढता परिणाम ; तरुणांमध्ये गुंडगिरी लागली वाढू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**विक्रम शिंदे**

**भोर :** गावातील मुलीशी बोलतो म्हणून संगमनेर (ता.भोर )येथील उच्च शिक्षित तरुणास एकाने जबर मारहाण केल्याची घटना संगमनेर (ता.भोर) येथेरविवार (दि.१) घडली आहे.साहिल उत्कर्ष बांदल असे आरोपीचे नाव असून त्याचे विरोधात रोहन विनायक धुमाळ यांनी राजगड नसरापूर पोलीस ठाणे अंकित किकवी पोलिसात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी हकीकत अशी फिर्यादी आपल्या मित्रांसमवेत गावातील मंदिर परिसरात गप्पा मारत बसला होता. दरम्यान आरोपी साहिल बांदल हा त्या ठिकाणी आला आणि फिर्यादीस तुझ्यासोबत बोलायचं आहे तू मंदिरात ये असे म्हटला. फिर्यादी एकटाच मंदिरात आला असता आरोपी साहिल याने फिर्यादीस दमदाटी तसेच शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.तू शिवीगाळ तसेच दमदाटी करू नकोस असे फिर्यादी आरोपीस म्हणाला .मात्र



तू गावातील मुलीबरोबर का बोलतोस असे विचारत आरोपी साहिल याने फिर्यादी रोहन यांस स्टॅम्पने मारहाण करण्यास सुरुवात केली.या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्यात ,पाठीवर आणि डाव्या हातावर जबर मारहाण करण्यात आली.मंदिररिसरातील फिर्यादीच्या मित्रांनी दोघांचे भांडण सोडवले आणि आरोपी घरी गेला दरम्यान फिर्यादी आपले मामा रमेश बांदल यांच्यासह आरोपीच्या घरी गेले. फिर्यादीच्या मामाने रोहन यास मारहाण का केली अशी विचारणा आरोपीस केली असता आरोपी घरातून कोयता घेऊन आला तसेच दहशत माजवत पुन्हा रोहन यांस शिवीगाळ करू लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

**संतोष देशमुख हत्येचा वाढता प्रभाव :**

सध्या भोर तालुक्यात महाविद्यालयीन तरुणांमध्ये गुंडगिरीचे प्रमाण वाढले असून किरकोळ कारणांमूळे कोयत्याने मारहाण करणे दहशत माजविण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.शोशल मिडियाचा वाढता वापर ,भाईगिरीची क्रेज आणि मारहाण करतानाचे व्हिडीओ काढून सोशल मीडियावर टाकणे यामुळे राज्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा प्रभाव गावोगावी वाढला की काय असा प्रश्न आता सामान्यांना पडू लागला आहे.

# सह्याद्रीत व्याघ्रसंख्या सातवर नव्या नर वाघाचा आगमन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर / पाटण:** सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आणखी एका नव्या नर वाघाची अधिकृत नोंद झाली आहे. त्याला टी ९ – शिलेदार असे सांकेतिक क्रमांक देण्यात आला असून स्थानिक मार्गदर्शकांनी त्याला शिलेदार असे नाव ठेवले आहे. या आगमनामुळे प्रकल्पातील वाघांची संख्या आता सातवर पोहोचली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून चांडोळी राष्ट्रीय उद्यान परिसरात या वाघाचे फोटो आणि चित्रपट कॅमेरा जाळ्याद्वारे मिळत होते. वन विभागाने त्याची नोंद अधिकृत केली आहे.

सध्या टी ५ 'तारा' या वाघिणीच्या अधिवासात टी १ 'सेनापती', टी २ 'सुभेदार' आणि टी ९ 'शिलेदार' हे तीन नर वाघ फिरताना दिसत आहेत. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, एकापेक्षा अधिक नर वाघिणीच्या क्षेत्रात असणे परिसंस्थेची ताकद दर्शवते आणि प्रजननाची शक्यता वाढवते.

सह्याद्री प्रकल्पातील नोंदवलेले वाघ: टी १ सेनापती, टी २ सुभेदार, टी ३ बाजी, टी ४ चंदा, टी ५ तारा, टी ६ हिरकणी आणि टी ९ शिलेदार. सेनापती आणि चंदा यांचा एकत्रित वावर नैसर्गिक प्रजनन प्रक्रियेचा भाग मानला जात असून त्यामुळे वाघसंख्या वाढण्याची अपेक्षा आहे.

विशेष म्हणजे तारा या धाडसी वाघिणीने ताडोबा येथून बारणा धरणातील पाण्यातून दीड किलोमीटर अंतर फक्त ४५ मिनिटांत पोहून पार केले. तिची जोडी कोणत्या नरासोबत जमेते, याकडे वन्यजीव अभ्यासकांचे लक्ष आहे.

वाढती वाघसंख्या वन विभाग, स्थानिक प्रशासन आणि वन्यजीवप्रेमी यांच्या संयुक्त संवर्धन प्रयत्नांचे यश मानले जाते. नव्या शिलेदारच्या आगमनामुळे सह्याद्रीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पुण्यस्मरणानिमित्त संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी** : वारकरी परंपरेचा सुगंध लाभलेल्या आळंदी नगरीतील आळंदी देवाची वि.वि.का. सोसायटीच्या माजी चेअरमन गं.भा. विमल गोपाळ पाटील कुऱ्हाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य 'संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा' सोमवार दि.९ मार्च ते सोमवार दि.१६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. भक्तिभाव, ज्ञान आणि नामसंकीर्तनाच्या मंगल वातावरणात हा सोहळा पार पडणार असून भागवताचार्य ह.भ.प. सिद्राम महाराज काळे यांच्या रसाळ वाणीतील कथामृताचा लाभ भाविकांना मिळणार असल्याचे ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे यांनी सांगितले.

कथामालेची सुरुवात 'श्रीमद्भागवत महात्म्य' व 'सृष्टी वर्णन' या विषयांनी होणार असून वराह अवतार, कपील अवतार, भक्त ध्रुव, जडभरत, प्रल्हाद चरित्र, वामन अवतार, श्रीराम जन्म, श्रीकृष्ण जन्म, कृष्ण बाललीला, गोवर्धन पूजा, कंसवध ते परीक्षित मोक्ष आणि कलीयुगातील भागवत महात्म्य अशा विविध अध्यायांवर प्रवचन होणार आहे. दररोज सकाळी ९ ते ११.३० व सायंकाळी ६ ते ८.३० या वेळेत कथा होईल, तर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ होणार आहे. तसेच दररोज रात्री ऋषिकेश पाटील, निवृत्ती धावेकर, ज्योतीताई गोराणे, संगीत अलंकार विष्णुबुवा सोळंके, पंडित कल्याण गायकवाड व कौस्तुभ गायकवाड, ज्ञानेश्वर मेश्राम आणि अभिनव गंधर्व रघुनाथ खंडाळकर यांची संगीत भजन सेवा होणार आहे. सोहळ्याचा समारोप सोमवार दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. माऊली महाराज सावर्डेकर यांच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे व भैरवनाथ उत्सव मंडळाचे अध्यक्ष शंकरराव कुऱ्हाडे यांनी सांगितले की, स्वर्गीय विमलकाकू यांनी आयुष्यभर अध्यात्म, संस्कार आणि समाजकार्य यांची जपणूक केली. त्यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून हा श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आला असून सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# सोशल मीडियाचा अतिवापर शालेय विद्यार्थ्यांसाठी घातक

## सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**खामुंडी :** (ता. जुन्नर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या संकल्पनेतून दि. ६ रोजी विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या अतिवापराबाबत मार्गदर्शन करताना सोशल मीडियाचा अति वापर हा शालेय विद्यार्थ्यांसाठी घातक ठरू शकतो, असे सांगितले.

डॉ. मनीषा गाडेकर, अनिता तितर, विशाल घुले व सूरज शिरसाठ यांच्या सौजन्याने आयोजित या आरोग्य शिबिरात शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग होता. यावेळी काही दिवसांपूर्वी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल व सोशल मीडियाचा मर्यादित वापर करण्याचा सल्ला दिला. विशेषतः इन्स्टाग्रामसारख्या माध्यमांचा अति वापर टाळावा, अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे आणि चुकीच्या मार्गाला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहावे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संदीप गंभीर, राम भोर, मंगेश शिंगोटे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य जितेंद्र रोकडे, कैलास बोडके, नितेश रोकडे, गणेश सोनवणे, नवनाथ शिंगोटे, सुहास नलावडे तसेच शिक्षक सविता हिरे,



दीपाली डुंबरे, शोभा खर्गे, सुखदेव पथवे, संजय आहेर, सुवर्णा नांगरे, सुनीता वर्पे आदी उपस्थित होते. आजच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना झालेल्या मार्गदर्शनाने मोबाईल विरहित शाळा संकल्पनेला चालना मिळाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली होती.

द•ख•ल



## श्री नारायण महाराज विद्यालयाचा एनएमएमएस परीक्षेत उल्लेखनीय निकाल

**नारायणगव्हाण :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेण्यात येणाऱ्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ चा निकाल जाहीर झाला असून पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील श्री नारायण महाराज विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातील १० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ७० टक्के लागला आहे.

या परीक्षेत कुमारी विद्या राजेंद्र शेळके हिने ११९ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर ओम नामदेव चिपाडे याने १०४ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच ओम संतोष कोहकडे (९७), कुमारी दीक्षा रामदास गायकवाड (९७), कुमारी प्रांजल दिलीप नवले (९५), संस्कार सुभाष रिकामे (९४) व सोहम विलास शेळके (८१) हे विद्यार्थीही उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. या यशासाठी मुख्याध्यापक वाय. के. बढे तसेच श्रीमती इथापे, भालेकर व कदम या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## बेलापूर बुद्रुक सोसायटीच्या अध्यक्षपदी अशोक कुन्हे



**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर बुद्रुक सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी अशोक रामभाऊ कुहे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सहाय्यक निबंधक श्री. गडेकर यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या निवडीप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, कर्मयोगी मुरलीधर खटोड पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र खटोड, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अरुण नाईक, माजी सरपंच भरत साळुंके, पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय कुन्हे, ज्ञानदेव वाबळे, बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेश खटोड आदी प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी संस्थेचे मावळते अध्यक्ष किशोर नवले, उपाध्यक्ष अंतोन अमोलिक, संचालक शेषराव पवार, राजेंद्र सातभाई, शिवाजी वाबळे, व्हा. चेअरमन अन्तोन अमोलिक, पंडितराव बोंबले, विश्वनाथ गवते, विशाल मेहेत्र, उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांना रिपाईच्या वतीने अभिवादन

**श्रीरामपूर :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि बहुजनांचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्रीरामपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास रिपाईच्यावतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी रिपाईच्यावतीने सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमावेळी रिपाईचे युवक शहराध्यक्ष विशाल सुरडकर, राष्ट्रीय जनसेना पार्टीचे जिल्हाध्यक्ष तेजस गायकवाड, विलास साळवे, अशोक शेळके, अर्जुन शेजवळ, विजय शेळके, स्वप्निल शिंदे, तुकाराम शेळके आणि विजय सोनवणे आदी उपस्थित होते.

### जामखेडला अतिक्रमण हटावसाठी

# जामखेड शहर कडकडीत बंद

## सर्वपक्षीय व संघटनांचा पाठिंबा

तालुका प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री









**जामखेड :** राष्ट्रीय महामार्ग कामाची अनियमितता व अतिक्रमणे याबाबत सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी उपोषण सुरू केले होते. तेव्हा राष्ट्रीय महामार्गचे अधिकारी नगरपरिषद, पोलीस प्रशासन व ठेकेदार यांनी पाच तारखेपासून हद्द निश्चितीच्या कामास सुरुवात करण्याचे लेखी दिले होते तेव्हा जामखेड बंद मागे घेऊन साखळी उपोषण सुरू केले होते. या साखळी उपोषणाला मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, नगर सकल मराठा समाजाचे नेते यांनी भेटी देत पाठिंबा दर्शविला होता.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी नियमानुसार अतिक्रमने हटवली जातील असे सांगितले होते तरीही आता अधिकारी टोलवाटोलवी करत आहेत यामुळे सर्व पक्षीय व संघटनाच्या वतीने आजपासून जामखेड शहर बेमुदत कडकडीत बंद ठेवण्यात आले आहे. शहरातील व्यापाऱ्यांनी आप आपली दुकाने बंद ठेवत अतिक्रण हटावसाठी पाठिंबा दिला आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे डेप्युटी इंजिनियर सुजित चेमटे यांनी दि.५ मार्च २०२६पर्यंत महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर दि. २६ फेब्रुवारी रोजीचा जामखेड बंद मागे घेतल्यानंतर ही दिलेल्या आश्वासना नुसार अतिक्रमण काढण्यासाठीची कोणतीही प्रक्रिया न केल्याने मागे घेतलेले जामखेड बंदचे आंदोलन पुन्हा पुकारले असून राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता सुजित चेमटे व संबंधित वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत हद्द निश्चित करत नाहीत तोपर्यंत आज पासून सर्व पक्षीय व सर्व सामाजिक संघटना यांच्या वतीने बेमुदत जामखेड शहर बंद पुकारण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले होते त्यानुसार बंद करण्यात आला आहे.

जामखेड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५४८डी जामखेड शहरातील रस्त्याच्या कामाला कायम स्वरूपी अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यासाठी दि. २६ मार्च २०२६ पासून अतिक्रमण बाबत अंतिम कार्यवाही होई पर्यंत सर्व पक्षीय जामखेड शहर बेमुदत बंद ठेवण्यात येणार होता मात्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता सुजित चेमटे यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर जामखेड बंद मागे घेण्यात आला होता.

गेली साडेतीन वर्षांपासून जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. ते अनेक अडथळे व कासव गतीने सुरू आहे. यामुळे अनेक छोटे-मोठे अपघातही झाले आहेत. यामध्ये अनेक जण जायबंदी तर काहींना आपले जीव गमवावे लागले आहेत. हे काम सुरू असताना अनेक अडचणींन बरोबरच अतिक्रमण काढणे हा मोठा अडथळा ठरत आहे.

विविध पक्ष संघटनांकडून अनेक आंदोलने तर प्रशासकीय पातळीवर अनेक बैठका तसेच जिल्हाधिकारी यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन अतिक्रमण काढण्याच्या सूचना करूनही काहीच होत नसल्याने अखेर जामखेडकरांनी सर्वपक्षीय व बेमुदत जामखेड बंदचे हत्यार उपसले त्याच अनुषंगाने जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी मार्गावरील अतिक्रमणाच्या प्रश्नावरून सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांनी काही दिवसांपूर्वी पुकारलेला बेमुदत बंद स्थगित करण्यात आला होता. मात्र सर्वपक्षीय साखळी उपोषण सुरू ठेवण्यात आले होते. त्याच पार्श्वभूमीवर दि. ५ मार्च रोजी निर्धारित मुद्दतीत हद्द निश्चित न झाल्याने दि. ६ मार्च पासून सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांनी जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी मार्गात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणामुळे जामखेड शहर बेमुदत बंद पुकारला आहे. याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे.शहरातील बहुतेक दुकाने बंद होती. आजच्या बंदसाठी काल सर्वपक्षीयांच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. आजच्या बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे.

## बेकायदेशीर गोमांस साठा जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा

**लिंपणगाव :** श्रीगोंदा शहर परिसरात बेकायदेशीररित्या गोमांस साठवून विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी दोन जणांविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी कारवाई करत मोठ्या प्रमाणात गोमांस जप्त केले असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. या छाप्यात आरोपींकडून अंदाजे ३० हजार रुपये किमतीचे सुमारे १५० किलो गोमांस जप्त करण्यात आले. तसेच गोमांस कापण्यासाठी वापरण्यात येणारा सुमारे २०० रुपये किमतीचा लोखंडी सत्तूर देखील पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत पंचनामा करून जप्त माल ताब्यात घेतला. या प्रकरणी आरोपी क्रमांक १ व २ यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून या प्रकरणाचा अधिक तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहेत. बेकायदेशीर गोमांस साठवणूक व विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही अशा कारवाया सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## पाणलोट कामांच्या चौकशीची मागणी

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** करंजी येथील ग्रामपंचायत हद्दीत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या जलसंधारण व पाणलोट कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत या कामांची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर आबासाहेब अकोलकर व ग्रामस्थांच्या सह्या असून चौकशी न झाल्यास उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, करंजी येथे गेल्या काही दिवसांपासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत विविध कामे सुरू आहेत. ही कामे करताना शासनाचे नियम डावलून कामे करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. पाणलोट समिती बदलून दुसरी समिती नेमण्यात आली असून लाभार्थ्यांना प्राधान्यक्रमाने लाभ देण्याऐवजी निधी इतरत्र वळविण्यात आल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गॅबियन बंधारे तसेच काही बंधाऱ्यांची खोली वाढविण्याची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली असून अवास्तव अंदाजपत्रक मंजूर करून ही कामे केल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशासकीय अधिकारी, पाणलोट समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच शेतकरी गट स्थापन करताना पात्र शेतकऱ्यांना संधी न देता मर्जीतील शेतकऱ्यांना कामे देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

पाणलोट समिती स्थापन झाल्यापासून आजपर्यंत झालेल्या सर्व कामांची गुणनियंत्रण विभागामार्फत सखोल चौकशी करून तोपर्यंत संबंधित कामांचे देयक अदा करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

> आमच्या कार्यकाळातील कामांची चौकशी जरूर करा; मात्र २०२२-२३ मध्ये पंधराव्या वित्त आयोगातून सरपंच व उपसरपंचांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचीही चौकशी व्हावी. ज्यांचा भ्रष्टाचार सिद्ध होईल त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा,
>
> **– नसीम रफीक शेख,सरपंच**

### चिचोंडीच्या सरपंचासह ११ जणांविरुद्ध गुन्हा

## विनयभंगाच्या तक्रारीनंतर गावात तणाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** चिचोंडी येथे शालेय कार्यक्रमानंतर दोन गटांमध्ये झालेल्या वादातून मारहाण व विनयभंगाच्या परस्पर तक्रारी पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात चिचोंडीचे विद्यमान सरपंच श्रीकांत एकनाथ आटकर यांच्यासह ११ जणांविरुद्ध जीवघेणा हल्ला केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भगवान अण्णा फुलमाळी (वय ४५, रा. चिचोंडी शिराळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १ मार्च रोजी तिरमल वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संगणक संच व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमानंतर रात्री सुमारे ११ वाजता एकनाथ गोविंद आटकर, श्रीकांत एकनाथ आटकर, राहुल व्यंकू आटकर, योगेश व्यंकू आटकर, अनिल साहेबराव आटकर, बाबासाहेब साहेबराव आटकर, गुलाब चंद्रभान फुलमाळी, काशीनाथ साहेबराव फुलमाळी, संदीप चंद्रभान फुलमाळी, साहेबराव गोविंद आटकर व भाऊसाहेब साहेबराव फुलमाळी हे लोखंडी रॉड, हॉकी स्टिक व लाकडी दांडके घेऊन त्यांच्या घरी आले.

तू कोणाला विचारून कार्यक्रम घेतला? असा जाब विचारत आरोपींनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या हल्ल्यात भगवान फुलमाळी यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. त्यानंतर आरोपींनी भास्कर आटकर यांच्या घरात जाऊन त्यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रार देण्यासाठी जात असताना मांडवे गावाजवळ आरोपींनी बोलेरो व विनानंबर स्विफ्ट कार आडवी लावून पुन्हा हल्ला केल्याचे सांगण्यात आले आहे.

या हल्ल्यात भगवान फुलमाळी व भास्कर आटकर यांच्या पायांना गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. दोघांवर नगर येथील पंडित हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली असून उपचार सुरू आहेत.

दरम्यान रंजना संदीप फुलमाळी यांनीही स्वतंत्र फिर्याद देत कार्यक्रमादरम्यान गैरवर्तन झाल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या तक्रारीनुसार भगवान फुलमाळी व इतरांनी संदीप फुलमाळी यांना मारहाण केली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलीस करत आहेत.

## ऐतिहासिक धानोरे घाटावर 'शिवतीर्थ'चा गजर!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनगाव:** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील ऐतिहासिक धानोरे घाटावर शिवजयंतीच्या पावन निमित्ताने 'शिवतीर्थ' साकार झाले असून सिंहासनारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. महंत दत्तगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला.

प्रवरामाईच्या पवित्र काठावर वसलेला धानोरे घाट हा धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाने समृद्ध आहे. दक्षिण-उत्तर वाहिनी असलेल्या प्रवरामाईच्या किनाऱ्यावर वसलेल्या या स्थळावर प्राचीन धनेश्वर देवस्थान मंदिर आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी करून येथे भव्य घाटही उभारला होता. धनेश्वर देवस्थानासोबतच श्री दत्तमहाराज, हनुमान, विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, भगवान विश्वकर्मा, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, श्री गणेश, शनी महाराज, गहिनीनाथ आणि अंबिका माता, खंडोबा मंदिर अशी अनेक मंदिरे एकाच परिसरात असल्याने धानोरे घाटाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

याच पवित्र भूमीत शिवजयंती निमित्त सिंहासनारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्रतिष्ठापना आणि 'शिवतीर्थ' मंदिराचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करून करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि सनईच्या सुमधुर सुरांत संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य महाआरती करण्यात आली. आकाशात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली आणि रोषणाईने उजळलेल्या वातावरणात उपस्थित शिवभक्तांनी जल्लोष व्यक्त केला.

या शिवतीर्थ मंदिराच्या उभारणीसाठी तसेच सिंहासनारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी आणि महाप्रसादासाठी धानोरे व परिसरातील ग्रामस्थांनी देणगी स्वरूपात मोठ्या प्रमाणात योगदान दिले.

## महसूल अंतर्गत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार : डॉ. घुले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**नेवासा :** नेवासा नगरपंचायतमध्ये शासन निर्णयाच्या अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या संदर्भात बैठकीचे आयोजन नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.महसूल अंतर्गत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले.

नेवासा नगरपंचायतच्या सभागृहात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील हे होते.यावेळी नेवासा मंडलाधिकारी अधिकारी अनिल गव्हाणे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानात करावयाच्या उपाययोजना व जनजागृती याबाबत झालेल्या शासन निर्णयाची माहिती त्यांनी यावेळी बोलतांना दिली.

महसूलचे अधिकारी फिरोज सय्यद यांनी देखील अभियानात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली.

यावेळी झालेल्या बैठकीच्या प्रसंगी नगरसेवक प्रविण सरोदे,ग्राम महसूल अधिकारी पल्लवी पवार, भालगाव येथील महसूल अधिकारी रुचिता कडाळी, नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण,गोधेगाव ग्रामपंचायत सरपंच बेबी नरोडे,खुपटी येथील दीपक चौधरी,विष्णू शिर्के,बाळासाहेब चौधरी,अरुण जाधव,सेतू चालक नीलिमा वाबळे,देविदास शिंदे,अमोल साळवे, तलाठी कार्यालयाचे राहुल चव्हाण,सागर पवार,खुपटीचे ग्राम महसूल अधिकारी एस आर शिंदे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.महसूल अधिकारी फिरोज सय्यद यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# हिंदू हृदयसम्राट प्रतिष्ठानच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सव उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**लिंपणगाव :** हिंदू हृदयसम्राट प्रतिष्ठानच्या वतीने श्रीगोंदा शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. शहरातील शनिचौक येथील आनंद हॉटेल समोर आयोजित करण्यात आलेल्या या भव्य शिवजयंती उत्सवाला शिवप्रेमी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन बबन दादा पाचपुते, पोलीस निरीक्षक किरण शिंदे, ह भ प भूषण महाराज महापुरुष, मनोहर दादा पोटे, नगराध्यक्षा सुनीता ताई खेतमाळीस, उपनगराध्यक्षा अलकाताई अनभुले, मीराताई खेंडके, चेतना मांगडे, नगरसेवक योगीराज गाडे, अख्तर भाई शेख व अरविंद कापसे यांनी केले यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करत सर्वसामान्यांना न्याय देणारे राज्य निर्माण केले. त्यांच्या शौर्य, धैर्य आणि दूरदृष्टीमुळे आजही तरुण पिढीला प्रेरणा मिळत असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन हिंदू हृदयसम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब दूतारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, युवक तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवरायांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. शिवजयंती उत्सवानिमित्त उपस्थितांना शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याबाबत माहिती देण्यात आली तसेच समाजात एकोपा, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेम वाढवण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. शहरात शिवजयंती उत्सवामुळे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## भाजप ट्रान्सपोर्ट सेल व कामगार युनियनच्या तालुकाध्यक्षपदी दीपक ठोंबरे



**निघोज :** भारतीय जनता पार्टीच्या युवा नेते दीपक ठोंबरे यांची भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन (पारनेर तालुका) अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे अध्यक्ष विजय हरगुडे आणि संघटनेचे संस्थापक अनुप मोरे यांनी ही नियुक्ती जाहीर करून त्यांना अधिकृत पत्र प्रदान केले. पारनेर तालुक्यातील यादववाडी येथील दीपक ठोंबरे हे सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले कार्यकर्ते असून गेल्या अनेक वर्षांपासून ते भाजपमध्ये सक्रिय आहेत. ट्रान्सपोर्ट सेलच्या माध्यमातून माथाडी, ट्रान्सपोर्ट व सुरक्षारक्षक कामगारांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने पाठपुरावा करत आहेत. सुपा एमआयडीसी परिसरातील कामगारांचे संघटन मजबूत करून औद्योगिक वसाहतीला पाठबळ देण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे. निवडीनंतर भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, सभापती गणेश शेळके, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले, सचिन वराळ आदींनी त्यांचा सन्मान केला. कामगारांच्या हक्कांसाठी निष्ठेने काम करण्याचा संकल्प ठोंबरे यांनी व्यक्त केला.

### कामाचे पैसे न मिळाल्याने भोकर ग्रामपंचायतीत

## जेसीबी चालकाचा विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**भोकर :** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर ग्रामपंचायतीत केलेल्या कामाचे पैसे मिळत नसल्याने एका जेसीबी चालक व मालकाने ग्रामपंचायत कार्यालयात विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी घडली. या प्रकारामुळे ग्रामपंचायत वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. संबंधित व्यक्तीस तातडीने श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या घटनेची नोंद उशिरापर्यंत तालुका पोलीस ठाण्यात झालेली नव्हती.

मिळालेल्या माहितीनुसार, भोकर येथील बबन चव्हाण हे जेसीबी चालक व मालक असून गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी ग्रामपंचायतीची विविध कामे केली होती. मात्र या कामांचे बिल अद्याप मिळाले नसल्याने ते शुक्रवारी दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात आले. माझे बँकेचे हप्ते भरायचे आहेत, तातडीने माझे पैसे द्या, अशी त्यांनी आग्रही मागणी केली.

यावेळी ग्रामविकास अधिकारी गणेश दुधाळे, सरपंचपती प्रताप पटारे, सदस्यपती ज्ञानेश्वर काळे, वेणुनाथ डुकरे, माजी सोसायटी चेअरमन दिलीप पटारे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. चर्चा सुरू असतानाच चव्हाण यांनी खिशातून विषाची बाटली काढून सर्वांसमक्ष ते प्राशन करण्याचा प्रयत्न केला. उपस्थितांनी तातडीने त्यांना थांबवून उपचारासाठी साखर कामगार रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर परिसरात मोठी चर्चा रंगली असून ग्रामपंचायत कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### व्हिडिओ व्हायरल; ग्रामपंचायतीत खळबळ

ग्रामपंचायत कार्यालयात घडलेला हा प्रकार एका युवकाने मोबाईलमध्ये चित्रित केला असून तो व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर व्हायरल झाला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयासह रुग्णालयात नागरिकांची मोठी गर्दी झाली. या घटनेनंतर ग्रामपंचायत कारभाराबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत.

## जमिनीच्या वादातून कोयत्याने हल्ला

### एक जखमी, सात जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान येथे जमिनीच्या वादातून एका व्यक्तीवर कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली असून या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तन्वीर सलीम शेख (वय २७, रा. घुमनदेव रोड, टाकळीभान, ता. श्रीरामपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, टाकळीभान शिवारातील वक्फ बोर्डाच्या गट क्रमांक ४९ मधील जमिनीच्या ताब्यावरून त्यांचा बादशहा शेख याच्याशी वाद सुरू होता.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ४ मार्च रोजी दुपारी सुमारे दोनच्या सुमारास ते घरी असताना बादशहा शेख हा काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून इतर साथीदारांसह त्यांच्या घरासमोर आला.

या वेळी आरोपींनी घरात घुसून फिर्यादीस शिवीगाळ करत मारहाण केली. त्यापैकी मुज्जु सादिक सय्यद याने कोयत्याने तन्वीर शेख यांच्या डोक्यावर वार केला. त्यानंतर इमाम बादशहा शेख याने डाव्या हातावर कोयत्याने वार केला, तर यास्मीन इमाम शेख हिने उजव्या हाताच्या मनगटावर वार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या हल्ल्यात तन्वीर शेख गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धक्काबुक्कीत त्यांच्या पत्नी आसमा याही किरकोळ जखमी झाल्या. दरम्यान आरोपींनी घरातील संसारोपयोगी साहित्याची तोडफोड करत कपाटातील सुमारे ६५ हजार रुपये रोख रक्कम घेऊन पसार झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी इमाम बादशहा शेख, यास्मीन इमाम शेख, झिशान इमाम शेख, रज्जाक इमाम शेख, रेहान इमाम शेख (सर्व रा. टाकळीभान), तौफिक सत्तार शेख (रा. वार्ड क्र.२, श्रीरामपूर) व मुज्जु सादिक सय्यद (रा. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांच्यासह काही अनोळखी व्यक्तींविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलम न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

## पूर्ववैमनस्यातून कोयत्याने वार; गायकवाडला १० वर्षे कारावास

**कोपरगाव :** पूर्ववैमनस्यातून कोपरगाव शहरातील गांधीनगर भागातील गणेश मारुती गायकवाड याने अमोल किशोर मंजुळ यांच्या डोक्यात कोयता घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी साक्ष पुराव्यांच्या आधारे गणेश गायकवाड यास कोपरगाव येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश डी. डी. अलमले यांनी दहा वर्ष कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. दि. १ जानेवारी २०१८ रोजी रात्री दरम्यान फिर्यादी अमोल किशोर मंजूळ याचा चुलतभाऊ रामदास मंजुळ यांच्या मुलीचा हळदीचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी स्वप्निल मंजुळ, विकी मंजुळ व इतर नातेवाईक घरासमोर उभे होते. तेव्हा गणेश मारुती गायकवाड (रा. झेंडागल्ली, गांधीनगर, कोपरगाव) हा तीथे आला. त्याच्या हातात लोखंडी कोयता होता. मागील भांडणाच्या कारणावरून गणेश याने अमोलवर जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने वार केले. यात अमोल मंजुळ यांच्या हाताला जबर दुखापत झाली. मंजुळ हा गंभिर जखमी होवून खाली पडला. घटनेनंतर आरोपी गणेश गायकवाड हा पळून गेला.

या प्रकरणी कोपरगांव पोलीस ठाण्यात भा.द.वि. ३०७, ५०६ कलमान्वये गणेश गायकवाड याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. दोषारोपपत्र कोपरगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. या खटल्यात सरकारी वकिल म्हणून शरद गुजर यांनी काम पाहिले. खटल्यामध्ये सात साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी व डॉक्टरांची साक्ष महत्वाची ठरली. तत्कालिन सहाय्यक पोलिस निरीक्षक व्ही. आर. थोरात हे तपासी अधिकारी होते. साक्ष-पुराव्यांच्या आधारे गणेश मारुती गायकवाड यास जिल्हा व सत्र न्यायाधिश डी. डी. अलमले यांनी दहा वर्ष कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

## गुहा गावातील यात्रेला न्यायालयाचा ब्रेक

### गावकऱ्यांत उत्सुकता व संभ्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राहुरी तालुक्यातील गुहा गावात दरवर्षी उत्साहात भरवली जाणारी कान्होबा देव उर्फ हजरत बाबा रमजान दर्ग्याची यात्रा यंदा मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे थांबण्याच्या स्थितीत आली आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर गावात उत्सुकता असतानाच आता संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कान्होबा देव उर्फ हजरत बाबा रमजान दर्गा वक्फ गुहा संस्थेचे ट्रस्टी आणि मुस्लिम समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत न्यायालयाच्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, गुहा येथे काही जणांनी स्थापन केलेल्या कान्होबा उर्फ कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट यात्रा समितीने २ ते ९ मार्च २०२६ या कालावधीत यात्रेचे कार्यक्रम जाहीर केले होते.

मात्र या संदर्भातील वाद सध्या वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे सुरू असून दावा क्रमांक १६/२०२३ मध्ये न्यायालयाने यापूर्वीच संबंधित ठिकाणी कोणतेही धार्मिक कार्यक्रम, विधी किंवा यात्रा घेण्यास स्थगिती दिल्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे न्यायालयीन आदेशाचे पालन व्हावे आणि गावातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

गुहा गावात ही यात्रा धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक मानली जात असल्याने न्यायालयीन निर्णयामुळे गावकऱ्यांमध्ये चर्चा रंगू लागली आहे. अनेकांना यात्रेची परंपरा आणि न्यायालयीन प्रक्रिया यामध्ये समतोल कसा साधला जाईल, याची उत्सुकता लागली आहे. दरम्यान प्रशासनानेही परिस्थितीवर लक्ष ठेवले असून शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्याला प्राधान्य दिले जात आहे.

## प्रगतीशील, शाश्वत व सर्वसमावेशक अर्थसंकल्प : आ.खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** महाराष्ट्र राज्याचा २०२६ चा अर्थसंकल्प हा दूरदृष्टी, महत्त्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी असल्याची प्रतिक्रिया संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली. कृषी, ग्रामीण विकास, शेतकरी कल्याण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्याला प्राधान्य देत राज्याच्या सर्वांगीण विकासाचा स्पष्ट रोडमॅप या अर्थसंकल्पातून मांडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी कृषी जीडीपी सध्याच्या ५५ अब्ज डॉलर्सवरून ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शेतमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, विविध पिकांसाठी एकात्मिक मूल्यसाखळी विकसित करणे तसेच शेतकरी कल्याणासाठी डिजिटल साधनांचा वापर वाढविणे यांसारख्या उपक्रमांमुळे कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल, असे आमदार खताळ यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून शेतपाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण होणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील शेती व वाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली असून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची तरतूद ही शेतकऱ्यांच्या प्रामाणिकपणाचा सन्मान करणारी असल्याचे त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पाबाबत प्रतिक्रिया देताना आमदार अमोल खताळ म्हणाले की, हा अर्थसंकल्प दूरदृष्टी असलेला, महत्त्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी आहे. स्वर्गीय अजित पवार यांच्या कार्याचा वारसा जपत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकास आणि कल्याण यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने शेतकरी, ग्रामीण भाग आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून हा अर्थसंकल्प सादर केला आहे.

या जनहितकारी व विकासाभिमुख अर्थसंकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## रस्त्याच्या वादातून सोंगलेला हरभरा पेटवला, गुन्हा दाखल

**शिर्डी :** जमीनीत असलेल्या रस्त्याच्या वादातून शेतात सोंगलेल्या हरभऱ्याच्या गंजीला आग लावून पेटवल्या प्रकरणी कोपरगाव तालुक्यातील खोपडी येथील शेतकऱ्याचा तीन एकर हरभरा गंजीला आग लावून पेटवून दिल्या प्रकरणी कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

याबाबत अलका संजय त्रिभुवन रा खोपडी यांनी दिलेल्या फिर्यादीत लिहुन दिली आहे की, मी वरील ठिकाणी पती संजय त्रिभवन, मुली सिमा संजय त्रिभवन, प्रेरणा संजय त्रिभवन, स्नेहन संजय त्रिभवन व सुश्मा संजय त्रिभवन असे एकत्र राहतो माझे पती व मी शेती करुन आमचे कुटुंब चालवतो. आमची खोपडी शिवारात शेत गट नंबर मध्ये ८३/ १/ ५ मध्ये ३ एकर शेती आहे त्यात आम्ही हरभरा पीक घेतले होते . आमचे शेजारी राहणारे शशिकांत विष्णु गायकवाड यांच्यात शेताच्या रस्त्यावरुन वाद आहे.

दि. २७ फ्रेबुवारी रोजी माझे पती संजय त्रिभवन हे मनमाड येथे गेले होते. त्यांना येण्यासाठी उशीर झाल्याने ते शिर्डीला आमचा पुतण्या नवनाथ दत्तात्रय त्रिभवन याच्याकडे थांबले होते. त्यावेळी एकर हरभरा सोंगुन गंज मारुन ठेवला होता. आम्ही शशिकांत विष्णु गायकवाड यांना आमच्या शेतातुन त्यांच्या शेतात जाण्यासाठी रस्ता एक पाऊलवाट दिलेली आहे परंतु त्यांना त्यापेक्षा मोठा रस्ता हवा आहे. त्यांना दुसरीकडुन त्यांच्या शेतात जाण्यासाठी रस्ता आहे परंतु ते विनाकारण आमच्याकडे रस्ता मागतात व आमच्याशी वाद करतात. आम्ही त्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी रस्ता न दिल्याचे कारणावरुन माझे पती घरी नसल्याचा फायदा घेवुन शशिकांत विष्णु गायकवाड रा खोपडी ह्याने कोणत्यातरी स्फोटकाच्या सहायाने जाळुन टाकुन आमचे शेतमालाचे नुकसान केले आहे.

## वीरभद्र यात्रेपूर्वी राहात्यात तणाव

### नगरसेवक तुपे यांना गोळ्या घालण्याची धमकी, गुन्हा दाखल



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता शहरातील वीरभद्र महाराज यात्रेपूर्वीच वातावरण तापले असून राहाता नगरपरिषदेचे नगरसेवक दशरथ तुपे यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तुषार सदाफळ याच्याविरुद्ध राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ मार्च रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास नगरसेवक दशरथ तुपे हे त्यांच्या प्रभागातील एका वरातीच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यावेळी तुषार सदाफळ याने फोन करून वीरभद्र महाराज यात्रेतील पाळणाघराचे टेंडर एका विशिष्ट समाजाला का देण्यात आले, असा जाब विचारत शिवीगाळ केली. तसेच शिवाजी महाराज चौकात येऊन दाखव, तुला गोळ्या घालून ठार मारीन, अशी धमकी दिल्याचे तुपे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे.

त्यानंतर सदाफळ याने शिवाजी महाराज चौकात काही जणांना जमवून आरडाओरडा करत दहशत निर्माण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष विजय सदाफळ, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ यांच्यासह नगरसेवकांनी राहाता पोलीस ठाणे गाठून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.

### ‘अशा प्रवृत्तींना ठेचून काढू’ : नगराध्यक्ष गाडेकर

नगरसेवक दशरथ तुपे यांना धमकी दिल्याची माहिती मिळाल्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात धाव घेतली. वीरभद्र महाराजांची यात्रा महिनाभरावर आली असताना अशा घटना घडणे दुर्दैवी आहे. शहरात सर्व समाजांना सोबत घेऊन प्रशासन चालवण्याचा आमचा प्रयत्न आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच ठेचून काढले जाईल, अशी प्रतिक्रिया नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी दिली.

### धमकीचा जाहीर निषेध : कैलास सदाफळ

दारूच्या नशेत शिवीगाळ करणे, बंदुकीची धमकी देणे किंवा संघटनेच्या नावावर दबाव टाकणे अशा प्रकारांचा आम्ही जाहीर निषेध करतो. नगरपालिकेच्या टेंडर प्रक्रियेत नगरसेवक तुपे यांचा कोणताही संबंध नसताना त्यांना धमकावणे चुकीचे आहे. भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करावी, असे मत माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ यांनी व्यक्त केले.


जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित

**श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अहिल्यानगर**

N.A.B.H. (Full Accredited) & ISO 9001:2015 Hospital अहिल्यानगर जिल्ह्यातील २६० बेडचे अद्ययावत एकमेव N.A.B.H. मान्यताप्राप्त रुग्णालय

आरोग्यसेवेची २५ वर्षे पूर्ण...

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आयोजित

**भव्य विविध मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर**

तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली

दि. ०८ ते ३० मार्च २०२६

रोज सकाळी १० ते दुपारी २

| वार/दिनांक | शिबीरांचे नांव | तज्ञ डॉक्टर्स |
|---|---|---|
| ०८ मार्च २०२६ रविवार | कॅन्सर तपासणी शिबीर– घशाचा, फुफ्फुसाचा, आतड्याचा, तोंडाचा इ. स्त्रियांचे कॅन्सर तपासणी शिबीर – मॅमोग्राफी मशिनद्वारे स्त्रियांच्या स्तनाचा कॅन्सर. शिबीराचे वेशिष्ट्ये : * स्त्रियांच्या गर्भपिशवीच्या कॅन्सर व निदानाकरिता सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी. सर्व प्रकारचे कॅन्सर उपचार, ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटीव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटीक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ.सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध. मॅमोग्राफी तपासणी रू. 100/- मात्र दरात केली जाईल. | कॅन्सर सर्जन : डॉ. अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन – डॉ. तुषार मुळे, कॅन्सर विकार तज्ञ : डॉ. लिझा बलसारा, फिजिशियन – डॉ. गजेंद्र गिरी, स्त्रीरोग तज्ञ – डॉ. रविंद्र मुथा, डॉ. सोनल बोरुडे, डॉ. हिरल चौधरी, रेडिओलॉजिस्ट – डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखीता जैन (कटारिया), पॅथोलॉजिस्ट : डॉ मुकुंद उंडे, डॉ. सारिका झरेकर, मायक्रोबायोलॉजिस्ट : डॉ. नरेंद्र पाटील |
| ११ मार्च २०२६ बुधवार | त्वचारोग तपासणी शिबीर – त्वचा ॲलर्जी, पांढऱ्या डागावरील उपचार, इसब, गजकर्ण, नायटा, केसांच्या, नखांच्या समस्या, सोरियासीस, चामखीळ, मसवरील उपचार, कुष्ठरोग इ. उपचार व मार्गदर्शन. | त्वचारोग तज्ञ – डॉ. विजया एरंडे |
| १३ मार्च २०२६ शुक्रवार | ब्लडप्रेशर, डायबेटीज् व इतर सर्व आजारांवर निदान व चिकित्सा साथीचे आजार व सर्व रोग निदान शिबीर. | एम.डी. मेडिसीन – डॉ. वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे |
| १४ मार्च २०२६ शनिवार | एंडो-युरोलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया – * प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मूत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन * प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. | मूत्रविकार शल्यचिकित्सक – डॉ. संकेत काळपांडे, डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनित देशपांडे |
| १५ मार्च २०२६ रविवार | भव्य हृदयरोग तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबीर – बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे. लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व ॲन्जिओप्लास्टी व सर्व शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत केल्या जातील. ॲन्जिओग्राफी रु. 3000/- मध्ये | कार्डीयाक सर्जन – डॉ. स्वप्निल कर्णे, डॉ. श्रीरंग रानडे, डॉ. इम्रान पटेल, डॉ. देखणे, डॉ. अगस्ती, एम.डी.मेडिसीन – डॉ. वसंत कटारिया, डॉ. विनोद चिंधे, कार्डिओलॉजीस्ट– डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया, कार्डीयाक ॲनेस्थेटीस्ट– डॉ. विनय छल्लाणी, एम.डी.मेडिसीन – डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे |
| १६ मार्च २०२६ सोमवार | किडनीचे आजार अंगावर सुज येणे, लघवी कमी/ लाल होणे, किडनी जंतु संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्सप्लांट * प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत डायलेसिस मोफत केले जातील. | नेफ्रोलॉजीस्ट – डॉ. गोविंद कासट, फिजिशियन – डॉ. प्राजक्ता पारधे |
| १७ मार्च २०२६ मंगळवार | मेंदुविकार शिबीर न्युरोलॉजी – डोके दुखी, अपस्मात, पॅरेलिसिस/पक्षाघात, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायुंचे विकार, मेंदुचा जंतु संसर्ग, मेंदुज्वर, स्मृतीभ्रंश इ. आजारांवर उपचार व मार्गदर्शन – ईईजी, ईएमजी, एनसीव्ही इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील. न्युरोसर्जन : मेंदु, मणके व मज्जारज्जू संबंधीत आजार तपासणी शिबीर ट्रॉमा सर्जरी, मेंदुतील रक्तस्राव, स्लीपडिस्क (मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे इत्यादीवर उपचार व शस्त्रक्रिया) पेडियाट्रिक न्युरोलॉजी, लहान मुलांमधील फिट, मेंदुविकार मतिमंदता, गतिमंदता, स्वमग्नता (ऑटिझम), आनुवंशिक आजार, अतिचंचलपणा, इ. आजारांवर | न्युरोलॉजीस्ट – डॉ. अद्वैत गिते, डॉ. वैशाली कदम, लहान मुलांचे मेंदुविकार तज्ञ – डॉ. स्नेहा म्हस्के |
| १८ मार्च २०२६ बुधवार | प्लॅस्टिक सर्जरी शिबीर– लहान मुलांचे जन्मजात हातांचे समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नस संबंधित आजार, जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण इ. तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, मान, सायनस आणि लाल ग्रंथीच्या साध्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडात होणाऱ्या लाल, पांढरे चट्टे, तिखट व मसालेदार अन्न खाण्यास अडचण येणे, तोंडाच्या व्रण यावर औषधोपचार.. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया | प्लॅस्टिक सर्जन : डॉ. आदित्य दमानी, डॉ. मृदुला मुळे |
| २० मार्च २०२६ शुक्रवार | श्वसनविकार तपासणी शिबीर फुफ्फुसाचे आजार, दमा, खोकला, ॲलर्जी इत्यादीवर उपचार | श्वसनविकार तज्ञ – डॉ. स्नेहा तिरपुडे, डॉ. प्रणाली त्रिमुखे |
| २४ मार्च २०२६ मंगळवार | अस्थिरोग तपासणी मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया व फिजिओथेरपी शिबीर– संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण/संपूर्ण खुबा प्रत्यारोपण रु. 65,000 पासुन पुढे- (गुणवत्तापूर्वक इन्प्लांटसह) औषध खर्च वेगळा. गुडघेदुखी (TKR पुनर्वसन): Knee pain (Total Knee Replacement Rehabilitation) गोठलेला खांदा (फ्रोजन शोल्डर): Frozen shoulder मानदुखी: Neck pain पाठदुखी: Back pain फ्रॅक्चर नंतरचे पुनर्वसन: Post fracture rehab बेल्स पाल्सी आणि चेहऱ्याचा कमकुवतपणा : Bell's palsy & facial weakness पक्षाघात (पॅरालिसिस) उपचार: Paralysis treatment | अस्थीरोग तज्ञ – डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन – डॉ. अमित सुराणा, डॉ. अक्षय गादिया, डॉ. श्रीकांत दलाल, फिजिओथेरपिस्ट – डॉ. अनुजा शिवणेकर/देशपांडे, डॉ. आराधना अरवडे, डॉ. अभय साठे |
| २५ मार्च २०२६ बुधवार | कान, नाक, घसा तपासणी शिबीर – स्पिच थेरपी तपासणी व मार्गदर्शन – ऑडिओमेट्री सुविधा उपलब्ध. | कान,नाक,घसा,तज्ञ – डॉ. सुकेशिनी गाडेकर, डॉ. अतुल तुपे, डॉ. अझर शेख (वाच्या व भाषा उपचार तज्ञ), डॉ. सुरज कर्डिले |
| २७ मार्च २०२६ शुक्रवार | बालरोग तपासणी शिबीर – नवजात शिशुंच्या सर्व आजारांवर निदान व उपचार. लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, हर्निया, डायाफ्रामॅटिक हर्निया, फायमोसीस, हायड्रोसील, अर्नाडसेंडेड टेस्टीस व इतर | बालरोग तज्ञ – डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दीपी अग्रवाल, डॉ. विजय साठे, डॉ. गणेश गव्हाणे, पिडियाट्रिक सर्जन – डॉ. रुपेश सिकची |
| २९ मार्च २०२६ रविवार | मोफत नेत्र रोग तपासणी– अल्पदरात मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबीर शिबिराचे ठिकाण : आनंदऋषिजी नेत्रालय, भगवान महावीर भवन. नाव नोंदणीसाठी संपर्क : 8686401515 | नेत्ररोग तज्ञ – डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. अशोक महाडीक, डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. विशाल तांबे, डॉ. किरण शिंदे, डॉ. नेहा भरडिया, डॉ. केतन राठोड, डॉ. विवेक पाऊलबुधे, डॉ. नलिनी गिते, डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ. निरंजन पेहरे, डॉ. पुनम लंकेश्वर व इतर नेत्रतज्ञ |
| ३० मार्च २०२६ सोमवार | दुबिर्णीद्वारे शस्त्रक्रिया (बीनाटाका)– * लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीचे ऑपरेशनच्या जागेतील (Inguinal) हार्नियाची शस्त्रक्रिया रू. 10000/- * पित्ताशय काढणे रु. 15000/- * स्त्रीयांची गर्भाशयाची पिशवी काढणे (हिस्ट्रेक्टॉमी)रू. 10000/- * स्टॅपलर/लेझर पाईल्स शस्त्रक्रिया रू. 15000/- * ॲपेंडिक्स ऑपरेशन रु. 4000/- लॅप्रोस्कोपी * स्त्रीयांचे बिजांडपोशावरील गाठी शस्त्रक्रिया रू. 5000/- * स्त्रीयांचेव्यंधत्वाची तपासणी करीता गर्भनलिकची ट्युबल पेटेन्सी रू. 2000/- * लॅप्रोस्कोपी स्त्रीयांचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया रू. 3000/- टिप : वरील शस्त्रक्रिया पॅकेजेस मध्ये औषध व आय.सी.यु. चा खर्च वेगळा असेल. | जनरल सर्जन, लॅप्रोस्कोपीक सर्जन – डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे, स्त्री रोग तज्ञ – डॉ. रविंद्र मुथा, डॉ. सौ. सोनल बोरूडे, डॉ. हिरल चौधरी, |

design : Yashwant # 98223 33823

महावीर भवन — रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित

श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अ.नगर

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

डिजिटल एक्सरे रू.250/- | सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह रू.800/-

सिमेन्स कंपनीचे जागतिक दर्जाचे Siemen's 96 Slice CT Scan Machine सिटीस्कॅन रू. 1250/-

सिमेन्स कंपनीचे जागतिक दर्जाचे MRI-1.5 Tesla MAGNOTOM ESSENZA DOT. एम.आर.आय. रू. 2500/-

१२४, आनंदऋषीजी मार्ग, अ.नगर. फोन : २३२०४७३, ७४, ७५ | मो. ९४०४३९९९११

हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.